cmyk

बैल पोळ्याच हा सण सर्जा राजाचा हा दिन
बळीराजा संगे जो राबतो रात्र-दिन
सांगा आम्हा कसे फेडावे तुझे हे ऋण
बैलपोळा
निमित्त सर्व शेतकरी
बांधवांना मनःपुर्वक शुभेच्छा..!
-संपादक

दै. राज्य
# लोकतंत्र



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–११७ | शुक्रवार, दि.२२ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### रेड्डींना विजयी करण्याचा आम्ही प्रयत्न करू: अरविंद केजरीवाल

नवी दिल्ली–आपचे दिल्लीतील राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल म्हणाले, विरोधकांच्या वतीने उपराष्ट्रपतीपदासाठी अर्ज दाखल करणारे न्यायमूर्ती रेड्डी यांनीही त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. निवडणुकीचे गणित आणि रणनीती यावरही दीर्घ चर्चा झाली. रेड्डी यांचा विजय सुनिश्चित करण्यासाठी आपण सर्व मिळून प्रयत्न करू, असे ते म्हणाले.

### मंत्री छगन भुजबळ सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आखाड्यात

नाशिक–मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात सिंहस्थ कुंभमेळ्यासंदर्भात आढावा बैठक झाली. या बैठकीला सर्व विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री नसलो तरी जिल्ह्यातील मंत्री म्हणून बैठक घेण्याचा अधिकार आहे, असे भुजबळांनी म्हटले आहे.

### गोदावरी नदीवरील पुलाला पुराचे पाणी

नाशिक–निफाड तालुक्यातील नांदूर मधमेश्वर गावाजवळ निफाड–सिन्नर तालुक्यातील गावांना जोडणाऱ्या गोदावरी नदीवरील पुलाला पाणी टच झाले. नांदूर मधमेश्वर धरणातून ४५ हजार ७६५ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. विसर्गात वाढ झाल्यास पुलावरून पाणी जाण्याची शक्यता आहे. पुलावर पाणी असल्यास वाहनधारकांनी आपली वाहने न नेण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### अर्बन नक्षलपेक्षा इथे शिस्त लावा– राज ठाकरे

मुंबई–अर्बन नक्षलपेक्षा इथे शिस्त लावा ना. इथे गरजेचे आहे. उद्या ज्या प्रकारच्या जमिनी अदानीच्या घशात घातल्या जाणार आहे. काय होणार आहे धारावीत. कोणते रस्ते होणार आहे. पुण्यासारखी परिस्थिती आहे. पुण्यात जाऊन बघा. थायलंडला जाऊन बघा. फक्त ब्रिज आणि मेट्रोने प्रश्न सुटणार नाही. तुम्हाला वाहने नियंत्रित करावे लागतील, अशा शब्दांत राज ठाकरेंनी सुनावले आहे.

### उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची फडणवीसांवर जबाबदारी

मुंबई–उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर जबाबदारी दिली गेली असल्याची सूत्रांची माहिती आहे. फडणवीस मविआतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करणार असून एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याबाबत सहमती मिळवणार असल्याचे समजते.

### दुसऱ्या दिवशीही पावसाची विश्रांती

मुंबई– तीन दिवसांच्या मुसळधार पावसाने आता थोडी विश्रांती घेतली आहे. दुसऱ्या दिवशी सुध्दा पावसाने विश्रांती दिल्याने शेती कामांना वेग आला आहे. गेल्या तीन दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे राज्यातील अनेक भागात मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांचे हाल झाले. परिसरात रोगराई पसरू नये यासाठी औषध फवारणी करून रोगराईवर नियंत्रण ठेवणे आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे या सर्व बाबींवर महानगरपालिकेने काटेकोर उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

## केंद्र सरकारने कापसावरील आयात सीमा शुल्क हटवले



**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारने परदेशातून आयात केल्या जाणा–या कापसावरील सीमा शुल्क रद्द केले आहे. १९ ऑगस्ट २०२५ पासून हा निर्णय लागू झाला आहे. त्यामुळे भारतातील कापूस उत्पादक शेतक–यांची चिंता वाढू शकते, अशी चर्चा सुरू झाली आहे.किमान कापसाला हमीभाव जाहीर केला पण मूल्य तेवढे मिळत नाही व्यापाऱ्याकडून पिळवणूक होत असल्याने आता सीमा शुल्क हटवल्याने भाव आणखी पडण्याची शक्यता असल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**

अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार कराराआधी आयात सीमा शुल्क रद्द करण्याची घटना घडली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रचंड टॅरिफ भारतावर लादल्यानंतर केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. टॅरिफच्या मुद्यावरून अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेली भूमिका आणि अमेरिकेसोबत होऊ घातलेल्या व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कापूस आयातीबद्दल निर्णय घेतला आहे. सोमवारी (१८ ऑगस्ट) रात्री केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि केंद्रीय अयक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने यासंदर्भातील अधिसूचना काढली आहे. परदेशातून आयात केल्या जाणा–या कापसावर ११ टक्के सीमा शुल्क होते.परदेशातून आयात केल्या जाणा–या कापसावर १९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत सीमा शुल्क रद्द करण्यात आले आहे. या निर्णयाचा अमेरिकेतील निर्यातदारांना थेट फायदा होणार आहे. अमेरिकेतील निर्यातदारांकडून भारतीय बाजारातील निर्बंध कमी होण्यासाठी भर दिला जात होता. दरम्यान, अमेरिकेने भारताकडून जास्त टॅरिफ वसूल केला जात असल्याचा आरोप करत ५० टक्के टॅरिफ लावला. त्यानंतर केंद्राने हा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे या निर्णयाने काही प्रमाणात भारतीय वस्त्रोद्योगालाही दिलासा मिळणार आहे. भारतीय वस्त्रोद्योगाला अमेरिकेच्या ६० टक्के ▶▶ पान २ वर

### कृषि, डेअरी सेक्टर खुले करण्याची मागणी

अमेरिकेकडून सातत्याने भारतावर कृषि आणि डेअरी सेक्टर खुले करण्यासाठी जोर दिला जात आहे. दोन्ही देशातील व्यापार करारही रखडला आहे. दोन्ही देशातील शिष्टमंडळामध्ये लवकरच व्यापार कराराबद्दल चर्चा होणार असून भारताने कापूस आयातीवरील सीमा शुल्क कमी अमेरिकेला भारताची भूमिका लवचिक असल्याचा मेसेज दिल्याचा अर्थही निर्णयानंतर लावला जात आहे.

## सौर फवारणी पंपावर शंभर टक्के अनुदान

### शेतकऱ्यांना दिलासा मिळणार; अर्जाची अंतिम तारीख जाहीर



**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी सौरऊर्जेवर चालणाऱ्या फवारणी पंपासाठी २०२५ ची नवीन योजना सुरू करण्यात आली असून सध्या याचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. सौर उर्जावरील फवारणी पंप हा शंभर टक्के अनुदानावर मिळणार असल्याने शेतकऱ्यांसाठी हा मोठा दिलासा असणार आहे.**

महाराष्ट्र सरकारकडून सौरऊर्जेवर चालणाऱ्या फवारणी पंपासाठी २०२५ साठी ऑनलाईन अर्ज घेणे सुरू झाले आहे. ही योजना शेतकऱ्यांसाठी खूप उपयुक्त आहे कारण यातून फवारणीसाठी लागणारा खर्च कमी होतो आणि जास्त काळ टिकणारी सुविधा मिळते. अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर मोबाईलवरूनही सहज अर्ज करता येतो. हे पंप टिकाऊ असतात, त्यांची देखभाल कमी खर्चात होते, आणि यासाठी सरकारकडून अनुदानही मिळते. सौरऊर्जेवर चालणारे पंप वापरल्यास इंधन खर्च वाचतो आणि ते पर्यावरणासाठीही चांगले असतात. अर्जासाठी २३.६० शुल्क आहे, जे तुम्ही, कोड, डेबिट कार्ड किंवा इतर डिजिटल पद्धतीने भरू शकता. पात सेव्ह करा किंवा प्रिंट काढा. लॉगिन केल्यावर ''घटक इतिहास पहा'' या पर्यायावर ▶▶ पान २ वर

**"जर तुम्ही महाराष्ट्रातील शेतकरी असाल आणि पीक संरक्षणासाठी खर्चिक नसलेला आणि आधुनिक उपाय शोधत असाल, तर ही योजना तुमच्यासाठी उत्तम संधी आहे. आजच महाडीबीटी पोर्टलवर मोबाईलवरून अर्ज करा आणि सौर फवारणी पंपाचा लाभ घ्या, असे आवाहन करण्यात आले आहे."**

## परळी;घरगुती वादातून तरूणाची कोयत्याने हत्या



**परळी । प्रतिनिधी**

**बीडमध्ये गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. अशातच परळीतून एक धक्कादायक घटना समोर येत आहे. घरगुती वादातून एका तरूणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. आधी संबंधित विषयावर जोरदार बाचाबाची झाली. नंतर कोयत्यानं तरूणाच्या डोक्यावर वार करण्यात आले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. आरोपी घटनास्थळावरून फरार झाला असून, सध्या पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे.**

भीमराव शिवाजी राठोड असे मृत तरूणाचे नाव आहे. तो परळी तालुक्यातील जळगाव येथील रतन नगर तांडा येथील रहिवासी होता. तर, अनिल बाबासाहेब चव्हाण असे आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल चव्हाण आणि मयत भीमराव राठोड यांच्यात घरगुती वाद होता. गेल्या काही दिवसांपासून हा वाद सुरू असल्याची माहिती आहे.अनिल चव्हाण यांनी याच वादातून भीमराव या तरूणाला संपवले असल्याची माहिती आहे. घटनेच्या दिवशी ▶▶ पान २ वर

## धनंजय मुंडेकडून घोटाळ्याची फाईल हरवली

### माजी कृषीसचिवांनी दिली होती फाईल; आता नव्या वादाला तोंड



**मुंबई । प्रतिनिधी**

**माजी कृषी सचिव व्हि.राधा यांची फाईल माजी मंत्री धनंजय मुंडेंनी गायब केल्याचे म्हटले जात आहे. फाईलबाबत धनंजय मुंडेंना लेखी उत्तर देण्यास लोकायुक्तांनी सांगितले आहे. त्यामुळे आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री धनंजय मुडेंवर कृषीमंत्री असताना भ्रष्टाचार केल्याचे गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले होते. तब्बल २०० कोटींचा घोटाळा झाल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला होता. तर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे हे कृषीमंत्री असताना सुमारे २४५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता. मात्र, कृषी साहित्य खरेदीप्रकरणात धनंजय मुंडेंना हायकोर्टात दिलासा मिळाला होता. धनंजय मुंडेंनी, कृषी सचिव 'व्ही. राधा' यांची फाइल गायब केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. व्ही. राधा या कृषी सचिव असतांना, कृषी विभागात झालेल्या भ्रष्टाचाराच्या आणि गौडबंगालाच्या रिपोर्टची फाइल ▶▶ पान २ वर

## सोने दराच्या घसरणीला ब्रेक

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सोने आणि चांदीचे दर गेल्या काही दिवसांपासून घसरण सुरु होती. गुरुवारी सोने आणि चांदीचे दर वाढले आहेत. चांदीचे दर १७४५ रुपयांनी वाढले आहेत. तर, सोन्याच्या दरात किरकोळ वाढ झाली आहे.**

२४ कॅरेट सोन्याचे दर ८ ऑगस्टच्या उच्चांकापेक्षा स्वस्त आहे. ८ ऑगस्टला २४ कॅरेट सोन्याचा दर १०१४०६ रुपये प्रति तोळा होता. त्यानंतर त्याच्यामध्ये २४४० रुपयांची घसरण झाली आहे. जीएसटीसह २४ कॅरेट ▶▶ पान २ वर

## बेपत्ता होमगार्ड महिलेचा नाल्यात मृतदेह

**बीड । प्रतिनिधी**

**शिवाजीनगर पोलीस ठाण्यात एक महिला होमगार्ड बेपत्ता असल्याची तक्रार काल दाखल करण्यात आली होती. आज सदर महिला होमगार्डचा मृतदेह आढळून आल्यानं परिसरात खळबळ उडाली आहे. मयत महिला गेवराई येथे होमगार्ड असल्याची माहिती समोर आली आहे. अयोध्या राहुल व्हरकटे (वय २६) असं मयत महिलेचं नाव आहे.**

बीड तालुक्यातील पांगरीच्या पुढे असलेल्या एका नाल्यात अयोध्या यांचा मृतदेह आढळून आला आहे. सध्या घटनास्थळी शिवाजीनगर पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे टीम पोहोचली आहे. दरम्यान अयोध्या यांच्या मृत्युमागचं कारण अद्याप समोर आलेलं नाही. शिवाजीनगर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत असल्याचंही सांगण्यात येत आहे. मयत महिलेचा मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतला असून त्याला शासकीय रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अयोध्या बेपत्ता झाल्याबाबत शिवाजीनगर ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. दोन दिवसांपासून त्या बेपत्ता होत्या. वासनवाडीच्या पुढे पांगरी ▶▶ पान २ वर

## जिल्ह्यातील सोयाबीनसह कपाशीवर मर रोगाचा प्रादुर्भाव

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यामध्ये सर्वदूर पावसाने हाहाकार माजवला आहे. याचा फटका बीड जिल्ह्याला देखील मोठ्या प्रमाणात बसला आहे. बीड जिल्ह्यामध्ये १७ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून तीन हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये सोयाबीनसह कपाशी पिकाचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.**

मागील आठवडाभरापासून राज्यातील अनेक भागात जोरदार पाऊस सुरू आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी झाली असून बीड जिल्ह्यात देखील गेल्या काही दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे. जिल्ह्यात अकरा तालुक्यांमध्ये अधिक पाऊस झाला असून अतिवृष्टी झाल्याची नोंद झाली आहे. ▶▶ पान २ वर

## विभागीय आयुक्तांचा दणका:अधिकार नसताना ४ प्रशासन अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्दचे आदेश



**बीड । प्रतिनिधी**

**बदलीचे अधिकार नसतांना विभागीय आयुक्त यांची मान्यता न घेता बीड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चार सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या केलेल्या बदल्या रद्द करण्यात याव्यात आणि दोषी विरुद्ध कारवाई करण्यात यावी, असे आदेश विभागीय आयुक्त यांनी दिले आहे.त्यामुळे सुनील नवले, जयलाल राजपूत, अनंत खेडकर व शिवाजी आदमुलवाड यांच्या बदल्या रद्द होणार असून नियमबाह्य बदल्या करणाऱ्या वर कारवाई देखील करण्यात येणार असल्याचे दिसत आहे.**

या संदर्भात दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या आदर्शात विभागीय आयुक्त यांनी म्हटले आहे की, बीड जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०२४ मध्ये जिल्हा परिषदेत बदली अपात्र चार सहायक प्रशासन अधिकारी सुनील नवले, ▶▶ पान २ वर

## राज्यसभेतही ऑनलाईन गेमिंग विधेयक मंजूर

### लोकसभेत फक्त ३७ तास चर्चा, १२ विधेयके मंजूर

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**राज्यसभेत ऑनलाइन गेमिंग विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. त्यामुळे जंगली रम्मी, क्रिकेटवरील ऑनलाईन गेम बंद होण्याची शक्यता आहे. तर लोकसभेत १२० पैकी फक्त ३७ तास चर्चा झाली असून १२ विधेयके मंजूर करण्यात आले.**

शेवटच्या दिवसाच्या कामकाजादरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सभागृहात १२० तासांच्या चर्चेचा वेळ निश्चित करण्यात आला होता, त्यामुळे केवळ ३७ तासांची चर्चा होऊ शकली. ऑनलाइन गेमिंग विधेयक संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा शेवटच्या दिवशी राज्यसभेतही मांडण्यात आले. या विधेयकाचा उद्देश ई–स्पोर्ट्स आणि ऑनलाइन सोशल गेमिंगला प्रोत्साहन देताना सर्व प्रकारच्या ऑनलाइन मनी गेमवर बंदी घालणे आहे. महिनाभर चाललेल्या अधिवेशनात लोकसभेने १२ आणि राज्यसभेने १५ विधेयके मंजूर केली. वारंवार व्यत्यय, तहकूब आणि बहिष्कार सत्र सुरूच राहिले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

## गेवराईच्या बिडिओ कांबळे रजेवर; अनिरुद्ध सानप यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार

**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी श्रीमती कांबळे या रजेवर गेल्यामुळे बिडिओ पदाचा अतिरिक्त कार्यभार अनिरुद्ध सानप यांच्याकडे देण्यात आला आहे. श्रीमती कांबळे यांच्या विनंती अर्जानुसार बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी रजा मंजुरी दिली आहे.**

गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे यांचा सेवानिवृत्तीचा कालावधी अवघा दोन महिन्यात राहिल्यामुळे त्यांनी १५ दिवसापूर्वी रजा मिळावी यासाठी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ▶▶ पान २ वर

## १२ आणि २८ टक्क्यांचा जीएसटीचा स्लॅब रद्द होणार



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारमण यांनी मंत्रिगटाच्या बैठकीत भारत सरकारच्या जीएसटीचा १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब रद्द करण्याचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला आहे. त्यामुळे बऱ्याच वस्तू स्वस्त होणार असून सर्वसामान्यांना दिलासा मिळणार आहे.**

केंद्र सरकारकडून सर्वसामान्यांना महागाईपासून दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. केंद्र सरकारने जीएसटीचे स्लॅब घटवून दोन केले आहेत. आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के जीएसटी असेल. तर, १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब पूर्णपणे बंद केला जाईल. २१ ऑगस्ट २०२५ ला झालेल्या बैठकीत मंत्रिगटाने केंद्र सरकारचा प्रस्ताव स्वीकारला आहे.

सध्या जीएसटीचे चार स्लॅब आहेत. ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के या चार पैकी दोन स्लॅब बंद केले जाणार आहेत. त्यामध्ये १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब पूर्णपणे संपवण्यात येईल. यामुळं सर्वसामान्य लोकांना दिलासा मिळेल, असे सांगितले जात आहे.

१२ टक्के स्लॅबमध्ये असलेल्या वस्तू आणि सेवा ५ टक्क्यांमध्ये येईल. तर, २८ टक्के स्लॅबमधील जवळपास ९० टक्के वस्तू १८ टक्क्यांमध्ये येतील. तंबाखू आणि पान मसाला ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# विचारांचा संघर्ष विचारांनी करावा

महाराष्ट्राला पुरोगामित्वाचा वारसा लाभला आहे. तो वारसा जतन करायचा असेल तर लोकांना अंधश्रद्धांचा त्याग करावा लागेल. वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. विचारांचा संघर्ष विचारांनी करणेच राज्यघटनेला अभिप्रेत आहे. तथापि, लोकांना त्यांच्या मूलभूत कर्तव्याचा विसर पडला आहे, असे मत माजी न्यायमूर्ती अभय ओक यांनी व्यक्त केले. महाराष्ट्राला संत आणि समाजसुधारकांची संपन्न परंपरा आहे. त्यांनी सर्वांनीच त्यांच्या पद्धतीने आणि त्यांच्या परीने समाजावरचा अंधश्रद्धांचा विळखा हटवण्यासाठी कष्ट वेचले. अभंगांमधून कठोर प्रहार केले. शिक्षणाने माणसाच्या बुद्धीचा विकास होतो. माणसे तर्कसंगत विचार करू लागतात.

सामाजिक बदल स्वीकारण्याची मानसिकता तयार होते. माणसे अनिष्ठ रुढी आणि परंपरा यांचा त्यांच्याही नकळत त्याग करतील अशा उद्देशांनी समाजसुधारक आणि शिक्षण प्रसारकांनी शिक्षणाचा प्रसार केला. त्याला काहीअंशी फळे आली, नाही असे नाही. पण कालौघात बहुसंख्य लोकांना त्यांच्या जबाबदारीचा विसर पडलेला आढळतो. संतांनी दाखवलेल्या मार्गावरून चालणे बहुसंख्य माणसे विसरली असावीत. अन्यथा संतांचे विचार अंमलात आणले गेले असते. उद्धार संत न करिती। मार्ग सांगती जनांपति। त्यांच्या बोधवचने प्रगती। केली पाहिजे साधके।। असा उपदेश संत तुकडोजी महाराजांनी केला आहे. अशा संत वचनांमधील गर्भितार्थ लोकांनी लक्षात घ्यायला हवा. दुर्दैवाने राजकारणीही त्यांच्या सोयीनेच विचारांचा पुरस्कार करतात. अघोरी पूजा करतात. मुख्यमंत्री गणपतीला दूध पाजतात. मंत्रिमंडळ घेऊन मुख्यमंत्री कामाख्या देवीच्या दर्शनाला जातात. ही शासकीय पातळीवरील कायद्याची पायमल्ली नाही का? समाजावर राजकारण्यांचा प्रभाव असतो त्यामुळे लोकांनाही तेच बरोबर वाटू लागले तर त्यात नवल नाही. कोणत्याही चांगल्या बदलांची सुरुवात स्वतःपासून करायची असते. पण त्याऐवजी बदल नेहमी दुसऱ्याच्या घरापासून सुरू व्हावेत अशीच अपेक्षा आढळते. म्हणूनच, 'अण्णा हजारे कुठे आहेत' अशा आशयाची विचारणा करणारा फलक पुण्यात झळकला. त्याला अण्णांनी जे उत्तर दिले ते लोकांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणारे ठरू शकेल. वयाच्या नव्वदाव्या वर्षी अण्णांनी काम करावे आणि लोकांनी मात्र झोपून राहावे हे योग्य नव्हे, असे अण्णांनी म्हटल्याचे वृत्त माध्यमांत प्रसिद्ध झाले आहे. दुसऱ्याकडे बोट दाखवून बदल घडणार नाहीत याची आठवण अण्णांनी करून दिल्याचे त्यात म्हटले आहे.

संत आणि समाजसुधारकही त्यांच्या साहित्यातून वेगळे काय सांगतात? वास्तविक, सामाजिक विकास प्रक्रियेतील लोकसहभाग सामाजिक परिवर्तन प्रक्रियेला गती देतो आणि शाश्वत विकास घडवू शकतो याची अनेक उदाहरणे आढळतात. राळेगणसिद्धी, हिवरेबाजार, पाटोदा ही त्यापैकी काही गावांची नावे. अशा अनेक गावांचा कायापालट लोकांच्या बळावरच होऊ शकला. अण्णांच्या पुढाकाराने माहिती अधिकार कायदा, दप्तर दिरंगाई कायदा, लोकपाल, लोकायुक्त अशा कायद्यांची शस्त्रे लोकांच्या हाती दिली. अनेक गावांनी कात टाकली. तथापि अण्णांच्या मागेही लाखोंची लोकशक्ती उभी ठाकली होती म्हणूनच परिवर्तन घडू शकले हे अण्णांनीही अनेकदा मान्य केले आहे. म्हणजेच लोकसंघटनेत विलक्षण ताकद असते. पण त्याची जाणीव अभावाने आढळते. त्याऐवजी कायदे धाब्यावर बसवणे, नियमांना हरताळ फासणे, नियमांची आणि कर्तव्याची आठवण करून देणाऱ्यांशी अरेरावीचे वर्तन यालाच पराक्रम मानला जातो.

सामाजिक भानाचा अभाव मग यंत्रणेच्याही सोयीचा ठरतो. उदाहरणार्थ, जादूटोणाविरोधी कायदा करून काही वर्षे उलटली. पण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे हे यंत्रणेचेच कर्तव्य असते याचा सोयीस्कर विसर सर्वांना पडतो. २०१३ साली हा कायदा अस्तित्वात आला, पण अद्यापही त्याच्या नियमांमध्ये स्पष्टता नाही. लोकांपर्यंत हा कायदा पोहोचलेला नाही, अशी तक्रार या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते करतात. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव अनेक बदलांना मारक ठरू शकतो. सुजाण समाज तसा दबाव यंत्रणा आणि शासनकर्त्यांवर निर्माण करू शकतो. यंत्रणेला जनहिताची कामे करण्यास भाग पाडू शकतो. पण त्यासाठी लोकांना त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव असायला हवी. सामाजिक भान जागरुक असायला हवे. याचीच आठवण न्यायमूर्तींनी आणि अण्णा हजारे यांनी करून दिली आहे. त्यातील मतितार्थ लक्षात लक्षात घेण्याची गरज आहे.

# ग्रामसेवक विजय शिंदे अडीच हजाराची लाच घेताना पकडला

जालना । प्रतिनिधी

**तक्रारदार यांनी तळेगाव ग्रामपंचायत ता. घनसावंगी जि. जालना येथे रोजगार हमी योजना अंतर्गत पाणंद रस्त्याच्या केलेल्या कामाच्या बिलाचा चेक देण्यासाठी विजय मोतीलाल शिंदे वय ५० वर्ष पद ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक) तळेगाव ता. घनसावंगी यांनी ५०,०००/-रुपये लाचेची मागणी करुन पहीला हप्ता २५,०००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले.**

विजय शिंदे रा. घर क्र. ३७ पांगारकर नगर, अंबड चौफुली जालना मूळ राहणार बडगाव तालुका मालेगाव जिल्हा नाशिक. सदरील घटना दि.२१.०८.२०२५ रोजी १२. वा. च्या सुमारास लक्ष्मी अँड राखी चाट भंडार समोर जालना ते अंबड रोडवर, अंबड चौफुली जालना येथे घटना घडली याबाबत थोडक्यात माहिती अशी की यातील तक्रारदार यांनी तळेगाव ग्रामपंचायत येथे रोजगार हमी योजना अंतर्गत पाणंद रस्त्याच्या केलेल्या कामाचे एकूण बिल ११,४०,०००/- रुपये तळेगाव ग्रामपंचायत कार्यालयात जमा झाले होते. नमूद बिलाचा चेक देणे साठी ग्रामसेवक विजय शिंदे यांनी ५०,००० रू लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे तक्रार केली होती.



सदर तक्रारीवरुन कार्यवाही दरम्यान ग्रामसेवक शिंदे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडुन २५,०००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना चे पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांनी व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले व ग्रामसेवक शिंदे यांचेवर पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे. सदरची कामगीरी श्रीमती, माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, श्री. शशिकांत शिनगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी तथा सहाय्यक सापळा अधिकारी पोउपअधीक्षक श्री. बी. एस. जाधवर, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे, व पथकातील पोलिस अंमलदार, पोहेकों / गजानन खरात, अतिश तिडके, पोलिस अंमलदार गजानन कांबळे अमोल चेके, मनोहर भुतेकर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली.

# अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान; तात्काळ मदतीची

जालना । प्रतिनिधी

**बदनापूर तालुक्यातील अंबडगाव, धोपटेश्वर, गेवराई बाजार व गोकुळवाडी परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. ही माहिती मिळताच आमदार नारायण कुचे यांच्या सूचनावरून बदनापूरचे तहसीलदार मा. हेमंत तायडे यांच्याशी संपर्क साधून स्थानिक पदाधिकारी व अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेतली.**



अंबडगाव, धोपटेश्वर, गेवराई बाजार व गोकुळवाडी शिवारात पाहणीदरम्यान शेतकरी शुभम प्रभाकर कान्हेरे, दिनेश नारायण कान्हेरे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले. सोयाबीन, मूग, उडीद, कापूस यांसारखी हंगामी पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. या पाहणीवेळी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेऊन प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याचे, शेतकऱ्यांना शासकीय मदत व अनुदान देण्याचे तसेच नुकसान भरपाई त्वरीत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले गेले. या वेळी बदनापूर तहसीलदार हेमंत तायडे, तालुका कृषी अधिकारी गोपाल गुजर, पंचायत समिती गटविकास अधिकारी सौ. ज्योती राठोड, मंडळ अधिकारी भारडीकर, बद्रीनाथ पठाडे पाटील, अनिलराव कोलते पाटील, भगवान मात्रे पाटील, तलाठी चव्हाण, सुरेश लहाने यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

# पोळा सण: बैलांच्या ऋणानुबंधांचा कृतज्ञतेचा महोत्सव

**भारतीय संस्कृतीत सण हे केवळ आनंदाचे निमित्त नसतात , तर ते आपल्या जीवनशैलीशी , निसर्गाशी आणि संस्कृतीशी असलेल्या नात्यांची जाणीव करून देतात . अशा अनेक सणांपैकी पोळा हा एक असा सण आहे, जो आपल्या कृषीसंस्कृतीतील बैल या अत्यंत महत्त्वाच्या जीवावर केंद्रित आहे . पोळा म्हणजेच बैलपोळा श्रावण महिन्यातील पिठोरी अमावास्येला साजरा होणारा सण हा शेतकरी आणि बैल यांच्यातील ऋणानुबंधाचे प्रतिक आहे . वर्षभर न थकता शेतकऱ्याच्या शेतीसाठी राबणाऱ्या बैलांना कृतज्ञतेने नमविण्याचा आणि त्यांचा सन्मान करण्याचा हा दिवस असतो.**



भारतात पोळा महाराष्ट्र , मध्य प्रदेश , छत्तीसगड , कर्नाटक या राज्यांत साजरा केला जातो . महाराष्ट्रात विशेषतः विदर्भ , मराठवाडा आणि खान्देश भागात या सणाला मोठं महत्त्व आहे. या दिवशी बैलांना आंघोळ घालून , त्यांच्या अंगाला हळद , तेल लावून, रंगीत रंगांनी सजवले जाते . गळ्यात माळा , घंटा , कवड्या , आणि पायात चांदीचे तोडे घातले जातात . शिंगांना रंग लावून ते उठून दिसतील अशी सजावट केली जाते . बैलांना जेवायला गोडधोड अन्न दिलं जात . संध्याकाळी गावातून बैलांची मिरवणूक काढली जाते . शेतकरी पारंपरिक वेशात , ढोल-ताशा , बॅन्ड , लेझीम यांच्या गजरात आपल्या बैलांसह सामील होतात . या मिरवणुकीत बैलांच्या सौंदर्यस्पर्धाही घेतल्या जातात . पोळ्याच्या आदल्या दिवसापासूनच तयारी सुरू होते . शेतकरी बैलांची साधने जसे की जू , सोंटा , नांगर झाडून-पुसून रंगवतात . महिलावर्ग घरातील सजावट करतो . विशेष पारंपरिक जेवण बनवलं जात , ज्यात पुरणपोळी , कांदाभजी , खिचडी , शेवया इत्यादी पदार्थ असतात . मुलांसाठी हा दिवस खास असतो कारण अनेक घरांत लहान मुलांना लाकडी बैलाचे खेळणे दिले जाते . ' तन्हा पोळा ' म्हणून दुसऱ्या दिवशी मुले हे खेळणे सजवून गावभर घेऊन फिरतात . पोळा सणाचे पुराणकाळापासून महत्त्व आहे . श्रीकृष्णाच्या गवळणारी जीवनशैलीत गोधनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे . बैल हे केवळ शेतीचे सहकारी नव्हे, तर ते जीवनशैलीचे अविभाज्य घटक होते . त्यामुळे पोळा हा फक्त सण नसून , एक प्रकारचा बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सांस्कृतिक दिन आहे . पूर्वीच्या काळी यंत्रांचा अभाव होता , तेव्हा शेतीतील सर्व कामं बैलांवर अवलंबून होती . नांगरणीपासून वाहतुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर बैलांचे योगदान अमूल्य होते . आजही काही भागांत ते तितक्याच श्रद्धेने वापरले जातात.सणाच्या दिवशी बैलांची पूजा केली जाते आणि विशेष मंत्र म्हणत बैलाला ओवाळले जाते . 'बैल माझा चांगला , मळ्यात नांगरतो ; पोळ्याला येता , माझं मन हरखतो ! ' अशा ओव्या गात गात बायका त्यांच्या कृतज्ञतेचे शब्द व्यक्त करतात . बैलांच्या गळ्यात लावलेल्या घंटा , पायातील तोडे , आणि मिरवणुकीतील ढोल-ताशांचे आवाज संपूर्ण गावात सणाचा आनंद निर्माण करतात . लोक एकमेकांच्या घरी जातात , एकत्र जेवतात , आणि बैलांच्या गोष्टी सांगतात . पोळा सण गावकरी , शेतकरी , महिला , आणि लहानग्यांना एकत्र आणणारा सण आहे. आधी बैलांना स्नान घालणे , नैसर्गिक रंगांनी सजवणे , त्यांना विश्रांती व चांगले जेवण देणे यावर भर होता . पण आता काही ठिकाणी डीजे , लाऊडस्पीकर , नाच-गाणी , रासायनिक रंग, प्लास्टिक सजावट यामुळे सणाचा मूळ हेतू हरवतो आहे . तसेच शेतीत ट्रॅक्टर , यंत्रसामग्री वाढल्यामुळे बैलांचे महत्त्व कमी झाले आहे . त्यासाठी आपण प्रयत्न व उपाययोजना करायला हव्या जसे की बैलपोळा सण पारंपरिक व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा . बैलांच्या सजावटीसाठी नैसर्गिक रंग व साहित्य वापरावे. मुलांना व तरुण पिढीला सणाचे खरे महत्त्व समजावून सांगावे . गावात सांस्कृतिक कार्यक्रम , पोवाडे , शेतकऱ्यांच्या कथा सांगून परंपरा जपावी . बैलपोळा सणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी परंपरा , पर्यावरण आणि संस्कृती यांचा सन्मान राखून सण साजरा करणे गरजेचे आहे. आजच्या यांत्रिकीकरणाच्या युगात पोळ्याचे महत्त्व काहीसे बदलले असले तरीही या सणाचे संस्कृतीशील मूल्य टिकवले गेले आहे . शहरी भागातही शाळांमधून लाकडी बैल , चित्रकला स्पर्धा, ओवी गायन , प्रात्यक्षिके , आणि पर्यावरणपूरक बैल बनवण्याचे उपक्रम राबवले जातात . सोशल मिडियावरून माहिती दिली जाते . काही ठिकाणी इको-फ्रेंडली पोळा साजरा केला जातो . या सणाद्वारे आपण निसर्ग , प्राणी , आणि शेती या तीनही घटकांना एकत्र बांधून ठेवणारा धागा जपतो . पोळा सण म्हणजे शेतकऱ्याचे आपल्या कामाच्या जोडीदाराबद्दलची कृतज्ञता , प्रेम , आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस . तो केवळ बैलांचा सण नाही , तर आपल्या संस्कृतीचा अभिमान आहे . म्हणूनच हा सण साजरा करताना प्रत्येकाने बैलांप्रती प्रेम , जपणूक आणि सन्मान जपावा . आजच्या पिढीनेही या सणाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, कारण ही आपली माती , आपली संस्कृती आणि आपली ओळख आहे.आपल्या बैलपोळा सणाची संस्कृती जतन करण्यासाठी काही गोष्टी करणे आवश्यक आहे : १. पारंपरिक पद्धती जपणे : बैलांना रंग , फुले , गोंडे लावताना नैसर्गिक व सुरक्षित वस्तूंचा वापर करावा . बैलांना सजवताना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी . २. पिढ्यान्? पिढ्या संस्कार देणे : लहान मुलांना बैलाचे महत्व , शेतकऱ्याचे श्रम व बैलपोळ्याची परंपरा याबद्दल सांगावे . शाळा , महाविद्यालयांमध्ये बैलपोळा विषयावर निबंध, नाटिका, चित्रकला स्पर्धा घेता येतात . ३. समाजातील सहभाग वाढवणे : गावागावांत बैलांची मिरवणूक , पारंपरिक खेळ व पोवाडे आयोजित करावेत . गावातील सर्वजण मिळून सण साजरा केल्यास एकतेची भावना वाढते . ४. आधुनिकतेसोबत जोडणे : मोबाईल , सोशल मीडियावरून बैलपोळ्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवावे . गावाची परंपरा दाखवणारे व्हिडिओ , माहितीपट तयार करून जतन करावेत . बैलपोळा संस्कृती जतन करण्यासाठी परंपरा , शिक्षण , समाजसहभाग, आधुनिक माध्यमे आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांचा योग्य संगम करणे गरजेचे आहे.



चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

## पान १ वरून...

### सौर फवारणी पंपावर शंभर

जाऊन संबंधित योजना निवडा आणि पावती पहा वर क्लिक करून पावती डाउनलोड करा. या योजनेसाठी अर्जदार शेतकरी असणं आवश्यक आहे. त्याच्याकडे वैध असावा आणि महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी झालेली असावी. पूर्वी लाभार्थ्यांची निवड लॉटरीने केली जायची, पण आता पहिले अर्ज, पहिले पात्रता या पद्धतीने लाभ दिला जातो. म्हणून उशीर न करता लवकरात लवकर अर्ज करणे महत्त्वाचे आहे.

-------------

### केंद्र सरकारने कापसावरील

टॅरिफमुळे झटका बसला आहे. अमेरिकेचे शिष्टमंडळ ऑगस्टमध्येच भारत दौ-यावर येणार होते. पण, हा दौरा रद्द करण्यात आला. २५ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीत अमेरिकेचे शिष्टमंडळ दाखल होणार होते. आता नव्याने दौ-याची तारीख जाहीर केली जाणार आहे.आहे.

--------------

### धनंजय मुंडेंकडून घोटाळ्याची

त्यांनी मंत्र्यांना पाठवली. मात्र, ही फाइल धनंजय मुंडेंनी गायब केली. लोकायुक्तांच्या सुनावणी दरम्यान, आज मी हे लोकायुक्तांपुढे मांडल्यानंतर, प्रतिभा पाटील नावाच्या उप सचिवांनी लोकायुक्तांना कन्फर्म केले, की ही फाइल मंत्र्यांना दिल्याचा जावक क्रमांक आहे. पण, ही फाईल त्यांच्याकडून राजीनाम्यानंतर परत आली नाही, अशी माहिती अंजली दमानिया यांनी ट्विट करुन दिली आहे.

**धनंजय मुंडे यांच्या अडचणीत वाढ होणार-अंजली दमानिया**

अतिशय महत्त्वाची सुनावणी झाली, कृषी घोटाळ्याच्या पीआयएलचा हवाला दिला. धनंजय मुंडे यांच्या अडचणीत वाढ होणार असून वी. राधा यांचा रिपोर्ट गायब केला, ती फाईल परत करावी लागणार आहे, असे अंजली दमानिया म्हणाल्या आहेत.

------------

### परळी;घरगुती वादावरून

अनिलने भीमरावला रतन नगर तांडा जळगाव येथे बोलावून घेतले. त्यांच्यात पुन्हा याच विषयावरून जोरदार शाब्दिक वार झाला. भांडणं टोकाला गेली. त्यानंतर आरोपीनं भीमरावच्या डोक्यात कोयत्याने सपासप वार केले. या गंभीर हल्ल्यात भीमरावचा जागीच मृत्यू झाला. कोयत्यानं वार केल्यानंतर आरोपी अनिल घटनास्थळावरून फरार झाला.

-------------

### जिल्ह्यातील सोयाबीनसह

यामुळे शेतांमध्ये पाणी साचले असून पिके देखील पाण्याखाली गेले आहेत. याचा परिणाम आता उत्पादनावर होणार आहे.दरम्यान नुकसानीसंदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी संबंधित महसूल मंडळ आणि जिल्हाधिका-यांना तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. या संदर्भात पालकमंत्री अजित पवार यांनी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासोबतही या संदर्भात माहिती विचारून तात्काळ पंचनामे करण्यात यावेत; अशा सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत.

-----------

### बेपत्ता होमगार्ड महिलेचा

जवळील एका नाल्यात अयोध्या यांचा मृतदेह आढळून आल्यामुळे आता पोलिसांनी एका महिलेस ताब्यात घेतलं असून त्या महिलेची चौकशी देखील सुरु असल्याचं सांगण्यात येत आहे . या घटनेमागे हत्येचा संशय व्यक्त करण्यात येतं असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

----------

### सोने दराच्या घसरणीला

सोन्याचा दर १०१९३४ रुपये तोळा आहे. २४ कॅरेट सोन्याच्या दरात २० रुपयांची वाढ झाली आहे. चांदीचा दर ११२९३९ रुपये किलोवर पोहोचला आहे. जीएसटीसह चांदीचा दर ११६३२७ रुपये किलोवर आहे. आयबीजेएनुसार बुधवारी चांदीचा जीएसटीशिवायचा दर १११११९४ रुपये प्रति किलो आहे. सोन्याचा दर ९८९४६ रुपये १० ग्रॅम आहे.

-------------------

### विभागीय आयुक्तचा दणका अधिकार नसताना

जयलाल राजपूत, अनंत खेडकर व शिवाजी आदमुलवाड यांच्या नियमबाह्य बदल्या केल्या. यामधील सुनील नवले शिक्षण विभागात दिड वर्षापूर्वी रुजू झाले असल्याचे बदलीस अपात्र होते. जयपाल राजपूत हे तीन वर्षांपूर्वी रुजू झाले होते. शिवाजी आदमुलवाड, पंचायत समिती, वडवणी येथे एका वर्षापूर्वीच रुजू झाले असून ते बदलीस अपात्र होते. शासन नियमानुसार विभाग, टेबल बदलीसाठी पाच वर्ष सेवेचा कार्यकाळ पूर्ण करावा लागतो. सर्वसाधारण बदल्यासाठी पाच वर्ष सेवा ज्येष्ठता ग्राह्य धरण्यात येते. प्रशासकीय बदलीसाठी १० वर्ष सेवा आवश्यक आहे. विनंती बदलीसाठी तीन वर्षे सेवा व्यतिरिक्त बदल्यांसाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. तसेच न्यायालयाच्या आदेशाने बदली करता येईल यापैकी काहीही नसताना सन २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकांच्या आचारसंहितेच्या कारणाने शासनाने दि.३१ मे पर्यंत बदल्याचे आदेश दिले नव्हते. दि. ३१ मे नंतरच्या अपवादात्मक बदल्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना असतांना नियमबाह्य आर्थिक लाभ घेवून मर्जीतील बदल्या करण्यात आल्या होत्या.वडवणी पंचायत समितीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी शिवाजी आदमुडवाड बदलीस पात्र नव्हते. तथापि गिरीष बिजलवाड, यांना जि.प. सेवेतून निलंबीत करण्यात आल्यानंतर शिक्षण विभाग (प्रा) कार्यालयातील कामाचा व्याप लक्षात घेता त्यांचे जागेवर शिवाजी आदमुलवाड, सहायक प्रशासन अधिकारी यांना पुर्णवेळ अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. गिरीष बिजलवाड, यांचा निलंबन कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त झालेला असल्याने त्यांना जिल्हा परिषद सेवेत पुनःस्थापित करण्यात आले. मात्र जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर रिक्त पद नल्यामुळे त्यांना पदस्थापना देण्याकरिता सहायक प्रशासन अधिकारी संवर्ग एकूण १९ मंजूर पदे असून सर्व पदे भरलेली असल्याने शिवाजी आदमुलवाड, यांच्या जागी गिरीष बिजलवाड, यांच्या निलंबनानतर पदस्थापना पदस्थापना देण्यात आली. शिवाजी आदमुलवाड, सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, वडवणी यांची ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ नुसार प्रशासकीय कारणास्तव शिक्षण विभाग येथे वेतन व भत्यासह पदस्थापना देण्यात आली होती. जयलाल राजपूत, सहायक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. बीड यांच्या कामकाजाविषयी तक्रारी प्राप्त झाल्यामुळे तसेच त्यांच्या शिक्षण विभागात यापूर्वी तक्रारी प्राप्त असल्याने शिक्षण विभागात स्थानांतरणाने त्यांची पदस्थापना केली नाही. प्रशासकीय सोयीच्या दृष्टिकोणातुन अनंत खेडकर, स.प्र.अ. यांची ग्रामीण पाणी पुरवठा विभागातून शिक्षण विभाग येथे स्थानांतरण करण्यात येवून त्यांचे जागेवर जयलाल राजपूत, स.प्र.अ. यांची शासन निर्णय दि.१५ मे, २०१४ नूसार शिक्षण विभाग येथे पदस्थापना केली आहे. सुनिल नवले, सहायक प्रशासन अधिकारी यांची शासन निर्णय दि. १५/०५/२०१४ नुसार प्रशासकीय कारणासाठी प्रशासकीय सोईच्या दृष्टीकोणातुन विभागांतर्गत स्थानांतराने त्यांची शिक्षण विभागातून सामान्य प्रशासन विभाग, जि.प. बीड येथे पदस्थापना केलेली आहे. शासन निर्णय नुसार जिल्हा परिषद एकाच विभागात ५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या बदल्या एका विभागातून दुस-या विभागात करण्याबाबत स्पष्ट तरतूद असतांना (१) जयलाल राजपूत (२) सुनिल नवले व (३) अनंत खेडकर या तिन्ही कर्मचा-यांना ते कार्यरत असलेल्या विभागात ५ वर्षे पूर्ण झालेले नसतांना त्यांचे स्थानांतरण, मध्यावधी पदस्थापनेमध्ये नियबाह्यरित्या बदल केल्याचे स्पष्ट झाले. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ मधील प्रकरण ५ मधील २ बदल्यांचा कालावधी यातील (दोन) मधील निर्देशानुसार तसेच शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ मधील प्रकरण -५ (१) नेमणुकीचा पदावधी वाढविणे कमी करणे यातील (एक) व (दोन) नूसार विभागीय आयुक्त कार्यालयास कारणमिमांसह प्रस्ताव सादर करण्यात येवून सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर मध्यावधी बदली करणे आवश्यक होते. सहाय्यक प्रशासन अधिकारी शिवाजी आदमुलवाड यांची नियमबाह्यरित्या केलेली बदली रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्थानांतराने / पदस्थापना करण्यात आलेल्या जयलाल राजपूत, सुनील नवले व अनंत खेडकर यांचा स्थानांतरण कालावधी पूर्ण झालेला नसतांना सूध्दा त्यांचा स्थानांतरणाव्दारे करण्यात आलेल्या पदस्थापना रद्द करण्यात येत असून सदर बदली, स्थानांतरण प्रक्रियेमध्ये अनियमितता करण्यास जे अधिकारी व कर्मचारी दोषी आहेत. अशा जबाबदार अधिकारी व कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रस्तूत कार्यालयास १५ दिवसांचे आंत सादर करावा, असे आदेश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत.

---------

### १२ आणि २८ टक्क्यांचा जीएसटीचा

याच्यावर अधिक जीएसटी अधिक असेल. जीएसटी स्लॅब कमी केल्यावर बऱ्याच वस्तू स्वस्त होणार असून सर्वसामान्यांना आता त्यामुळे दिलासा मिळणार आहे.

**काय स्वस्त होणार?**

१२ टक्के स्लॅब बंद करुन त्यातील वस्तू आणि सेवा ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये आणल्याने कर ७ टक्क्यांनी कमी होईल. यामुळे कपडे आणि रेडिमेड कपडे, चप्पल, बूट, प्रिंटिंग आणि स्टेशनरी वस्तू, प्रक्रिया केलेले अन्न पदार्थ, होम अप्लायन्सेस वरील कर कमी होईल. या बदलाचा थेट परिणाम मध्यम वर्गावर आणि सर्वसामान्य ग्राहकावर होईल. २८ टक्के स्लॅबमधील जवळपास ९० टक्के वस्तू १८ टक्के स्लॅभमध्ये आणल्याने त्या वस्तूंच्या किंमतीवर लागणारा कर १० टक्क्यांनी कमी होईल. यामुळे दुचाकी वाहने, चार चाकी कार, सीमेंट आणि बिल्डींग मटेरियल, फ्रीज, वॉशिंग मशीन, एअर कंडीशनर, टीव्ही याचा समावेश होतो. पॅकेजमधील अन्नपदार्थ, बेवरेजेस, पेंटस आणि वॉर्निश यावरील कर कमी होतील. यामुळे ग्राहकांसह रिअल इस्टेट आणि ऑटोमोबाइल सेक्टरमध्ये विक्रीत तेजी येऊ शकते.

------------------------

### गेवराईच्या बिडिओ कांबळे रजेवर; अनिरुद्ध

अर्ज केला होता. तथापि पालकमंत्री यांच्या दौऱ्यामुळे त्यांना रजा मंजूर करण्यात आली नव्हती. दरम्यान गट विकास अधिकारी कांबळे यांच्या कामकाजाविषयी गेवराईच्या लोकप्रतिनिधींच्या तक्रारी होत्या. त्यामुळे कांबळे यांना दिनांक २१ रोजी रजा मंजूर करण्यात आली आहे. गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार बीड पंचायत समितीला कार्यरत असलेल्या कृषी अधिकारी अनिरुद्ध सानप यांच्याकडे देण्यात आला आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात...



### प्रियदर्शनी शाळेचे शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी उपक्रम

पाटोदा । प्रतिनिधी

प्रियदर्शनी शाळेच्या उत्कृष्ट अनोखा उपक्रम शिक्षक विद्यार्थ्यांच्या प्रगती बाबत चर्चा करण्यासाठी त्यांच्या दारी जाणार आहे हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी विद्यार्थी कच्चा न राहावा व शाळेत कसा वागतो घरी कसा वागतो ही चौकशीसाठी उपक्रम सुसज्ज असा राबवण्यात आला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पाटोदा शहराचे माजी सरपंच. सौ . कुसुमताई आढागळे यांच्या हस्ते .दिनांक २१. ८ .२०२५ रोजी. संपन्न झाले. यावेळी माजी सरपंच कुसुमताई आडगळे या उपक्रमाबद्दल शाळेचे कौतुक केले असून व शिक्षकांचे कौतुक केले आहे या उपक्रमाबद्दल सर्व शाळांनी यांचा आदर्श घ्यावा व सर्वांना सहकार्य करण्याचे आश्वासन माजी सरपंच कुसुमताई अडागळे यांनी शाळेला आश्वासित केले. जिथे विद्यार्थी आणि शिक्षकांना अडचणी येतील तेथे सहकार्य करण्याचे आश्वासन कुसुमताई. अडगळे यांनी दिले.

### श्रृंगऋषीगड येथिल अंखड हरिनाम सप्ताहाची शनिवारी सांगता

गेवराई । प्रतिनिधी

शिरुर कासार तालुक्यातील शृंगऋषीगड शृंगारवाडी येथिल श्रावण मासात सुरु असलेल्या अंखड हरिनाम सप्ताहाची सांगता शनिवारी सकाळी ११ ते १ या वेळेत मंहत ह. भ. प. स्वामी जधार्धन महाराज. मठाधिपती मंच्छीद्रगड यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार असुन, तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी महाप्रसाद चा लाभ घ्यावा असे आवाहन गांवकरी यांच्या वतीने करण्यात आली आहे. साला बाद प्रमाणे शृंगारवाडी येथिल शृंगऋषीगड वर श्रावण मासा निमित्त अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आली आहे, शनिवारी १६ ऑगस्ट रोजी सप्ताहाचा प्रारंभ झाला असुन ह. भ. प. अशोक महाराज हाकाळे, बालकीर्तनकार ह. भ. प. कु, कार्तिकाताई महाराज गंडे, विनोदाचार्य ह. भ. प. देविदास महाराज निवळीकर,वेंदातचार्य मंहत बालाजी महाराज शास्त्री, किर्तनकेसरी, ह. भ. प भगवान महाराज गडदे, ज्ञानसिंधु ह. भ. प. राजाराम महाराज गंडे, धर्म भुषण, ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज गावडे यांचे किर्तन सेवा झाली असुन, संगीत राम कथा ह. भ. प. एकनाथ महाराज गाढे अशी विविध धार्मिक पर्वणी कार्यक्रम यथोचित झाले आहेत, सांगता शनिवारी दि, २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत मंहत स्वामी जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे तरी परिसरातील भाविक भक्तांनी महाप्रसाद चा लाभ घ्यावा असे आवाहन गांवकरी यांच्या वतीने करण्यात आली आहे,

### इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कुलचे एम.टी.एस.परिक्षेत घवघवीत यश

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. राज्यस्तरीय एम.टी.एस. च्या परिक्षेत बसलेले विद्यार्थी १०० टक्के उत्तीर्ण झाले आहेत.



तालुक्यातील युसुफ वडगाव सारख्या ग्रामीण भागात उच्च दर्जाचे शिक्षण देणारी संस्था म्हणून नावारूपाला आलेल्या इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी

एम.टी.एस.च्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले, तालुक्यांतील सर्वात जास्त मेडल प्राप्त करणारी शाळा हि इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल युसुफ राम वडगांव ही ठरली आहे,शाळेतील एम.टी.एस परीक्षेस बसलेल सर्व विद्यार्थी १००% उत्तीर्ण झाले. यामध्ये ०२ विदयार्थी विशेष प्रावीण्य सह ट्रॉफी साठी पात्र ठरले तर गोल्ड मेडल साठी एकुण २१, सिल्व्हर मेडल १९, तर इतर १५ विदयार्थी पास झाले आहेत,

अशा प्रकारे शैक्षणीक वर्ष २०२४-२५ मध्ये स्पर्धा परीक्षे मध्ये शाळेने घवघवीत यश संपादन केले, तसेच शिष्यवृत्ती परीक्षेतही मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी यश मिळणे अपेक्षित आहे,त्याबद्दल पालक समाधान व्यक्त करत असून शाळेचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे, की ग्रामीण भागात उच्च प्रतीचे शिक्षण देऊन विद्यार्थ्यानं मध्ये स्पर्धा परिक्षे बाबत आवड निर्माण करण्याचे काम शाळा करत आहे, ग्रामीण भागात सुद्धा शाळा चांगली आसेल तर विदयार्थी घडतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल युसुफ राम वडगांव गुणवत्ता पूर्ण, परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी नावाजलेली शाळा असून आजच्या स्पर्धेच्या युगात आपला विदयार्थी टिकला तर पाहिजे, पण त्याने यश हि संपादन केले पाहिजे यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत असतात. या सर्व विद्यार्थ्यांना आज ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्र व पुष्प गुच्छ देऊन संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले, यावेळी संस्थेचे संस्थापक प्रा.बापुसाहेब भुसारी,धनराज चोपणे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

## सुधाकर कोनाळे यांचे कॉन्ट्रॅक्टर असो. वतीने स्वागत

परळी प्रतिनिधी

परळी औष्णीक विद्युत केंद्रात बीड येथील सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे, निरीक्षक काशीद चव्हाण, सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांचे थर्मल पॉवर स्टेशन कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ॲण्ड सप्लायरच्या वतीने प्रशासकीय इमारतीत दि. १९ ऑगस्ट रोजी स्वागत करण्यात आले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष अंगदभाऊ हडबे तसेच त्यांच्या संघटनेच्या पदाधिकार्यांनी स्वागत केले. यावेळी थर्मल पॉवर स्टेशन कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ॲण्ड सप्लायरचे पदाधिकारी शिवाजी बिडगर, जयंतभाई पटेल, भगवान साकसमुद्रे, संजय थोरात, रमेश सरवदे, बंडू गित्ते,गोपाल मुंडे, राजन, संजय व्हावले, मधु नाईकवाडे , श्याम बिडगर,राजू गजले, के एच गित्ते मॅडमआदी उपस्थित होते.

# पतसंस्थांच्या घोटाळ्यात अडकलेल्या ठेवीदारांना मिळणार न्याय

## आ.सोळंके यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश; अमित शहा यांची महत्त्वाची घोषणा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**जिजाऊ, ज्ञानराधा, शुभ कल्याण, जिजामाता आणि राजस्थानी या बहुराज्यीय पतसंस्थांमध्ये झालेल्या मोठ्या घोटाळ्यामुळे हजारो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपयांचे पैसे अडकून पडले होते. या प्रकरणी आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आहे. आज लोकसभेत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी या पतसंस्थांविषयी महत्त्वाची घोषणा केली आहे.**

केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी लोकसभेत घोषणा करताना सांगितले की या सर्व पतसंस्थांना विघटित केले जाणार आहे. लिक्विडेटरमार्फत या संस्थांची संपत्ती विकली जाईल आणि मिळालेल्या रकमेतून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत दिले जाणार आहेत. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि न्यायसंगत पद्धतीने राबवली जाणार असल्याची खात्री त्यांनी दिली. या यशामागे आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे अथक प्रयत्न आहेत. त्यांनी राज्यस्तरावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सतत चर्चा केली आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सक्रिय सहभाग घेतला. राज्य सरकारकडे निरंतर दबाव आणून केंद्रीय पातळीवर चौकशीची मागणी केली. संबंधित केंद्रीय मंत्रांशी



भेटीगाठी करून संसदीय प्रश्न आणि ठराव मांडले.या पाच बहुराज्यीय पतसंस्थांमध्ये झालेल्या घोटाळ्यामुळे हजारो गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांचे पैसे अडकले आहेत. शेतकरी, कामगार, नोकरदार आणि व्यापारी यांना मोठा फटका बसला आहे. अनेकांनी आपल्या आयुष्यभरात जमवून ठेवलेले बचतीचे पैसे गमावले आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले.या घोषणेनंतर ठेवीदारांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. अनेक ठेवीदारांनी आमदार प्रकाश सोळंके यांचे आभार मानले आहेत. एका ठेवीदाराने म्हटले, ‘‘आम्ही जवळजवळ आशा सोडली होती. प्रकाश दादांच्या प्रयत्नांमुळे आज आमच्या न्यायाची आशा पुन्हा जागृत झाली आहे.‘‘या घोषणेनंतर लवकरच लिक्विडेटर नियुक्त केले जाणार आहेत. संस्थांची मालमत्तेची विस्तृत यादी तयार करून ठेवीदारांच्या दाव्यांची पडताळणी सुरू होणार आहे. चरणबद्ध पद्धतीने परतफेडीची प्रक्रिया राबवली जाणार असून या कामाला प्राथमिकता दिली जाणार आहे. या घोषणेमुळे हजारो ठेवीदारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. आमदार प्रकाश सोळंके यांच्या चिकाटी आणि दृढनिश्चयामुळे जनतेच्या पैशाचा हक्क परत मिळवण्यात यश आले आहे. ही घोषणा केवळ ठेवीदारांसाठी दिलासादायक नाही तर न्यायव्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाला बळकटी देणारी आहे. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली ही लढाई आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे आणि ठेवीदारांना त्यांचा हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### मातृभूमी प्रतिष्ठानकडून डॉ. दाभोळकर यांना अभिवादन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ .नरेंद्र दाभोळकर यांच्या बाराव्या पुण्यतिथीनिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य डी .जी.तांदळे व आम्रपाली साबळे यांच्या हस्ते डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी डी.जी. तांदळे म्हणाले की ,संविधानातील कलम ५१ अ मध्ये दिलेल्या नागरिकांच्या कर्तव्या पैकी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार, प्रचार व प्रसार करणे ही कर्तव्य पूर्ण करण्यासाठी डॉ नरेंद्र दाभोळकरांनी आयुष्यभर विज्ञान प्रसाराचे व अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचे स्मरण करण्यासाठी २०१४ सालापासून २० ऑगस्ट हा दिवस देशभर वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस म्हणून आयोजित केला जातो .या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या निघृण हत्ते च्या घटनेस २० ऑगस्ट २५ रोजी बारा वर्षे पूर्ण झाली आहेत .तरी अद्यापही त्यांच्या खुणा मागील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आलेली नाही. डॉ. दाभोळकरांना त्यांचे विचार संपविण्यासाठी केलेला एक सुनियोजित कट होता.

### जय जवान माध्यमिक विद्यालयात प्रा.सुशिलाताई यांचा वाढदिवस शैक्षणिक साहित्य वाटप करून साजरा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी,जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बुद्रुक तालुका वडवणी जिल्हा बीड विद्यालयात आमच्या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा, आमचे आधारस्तंभ,मार्गदर्शक बहुजनांच्या कैवारी, अतिदुर्गम भागात शिक्षणाची व्यवस्था निर्माण करून दिल्या व त्याअनेक विद्यालयातून वंचित,उपेक्षित,लोकांच्या मुला मुलींना शिक्षण देऊन त्यांचा उद्धार करणाऱ्या लोकनेत्या, आदरणीय, प्रा.सुशीलाताई मोराळे यांच्या जन्मदिनानिमित्त जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बु तालुका वडवणी जिल्हा बीड येथील शाळेत विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य वाटप व गोड खाऊ वाटप करण्यात येऊन त्यांचा जन्मदिवस साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रम साठी उपस्थित सर्व मान्यवर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य सर्व ग्रामपंचायत सदस्य, उपस्थित प्रमुख पाहुणे स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया चे राज्य सहसचिव मा.श्री. लहू पार्वती लक्ष्मण खारगे सर, मा.श्री. आस्तिक साबळे वडवणी तालुका कमिटी सदस्य,सर्व मान्यवर ग्रामस्थ शिक्षण प्रेमी पालक वृंद माजी विद्यार्थी मंडळ तसेच जिल्हा परिषद प्रा.शाळा कवडगाव बु, मुख्याध्यापक श्री. बडे सर, उर्दू प्राथमिक शाळा



कवडगाव बु येथील मुख्याध्यापिका बाजी मॅडम, विद्यालयातील प्राचार्य श्री सारोक्ते सर आदी उपस्थित सर्व मान्यवर यांच्या हस्ते सर्व विद्यार्थी जी प प्राथ शाळा कवडगाव, जी प प्राथ उर्दू शाळा कवडगाव व जय जवान माध्यमिक शाळा कवडगाव बु येथील सर्व विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू ,साहित्य वाटप करण्यात आले तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले खारगे सर यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेच्या बाबतीत सर्व विद्यार्थ्यांना माहिती देऊन सभासद नोंदणी करण्यात आली.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे - प्रदेशाध्यक्ष वाघमारे

**बीड । प्रतिनिधी**

**१४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली होत असुन या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.**

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे जाळे निर्माण करण्याचं काम आम्ही घेतलं आहे. राज्यातील जवळपास ३० जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या गेल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांत सुध्दा डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा पदाधिकारी निवडी संदर्भात यंत्रणा उभी केली गेली आहे. महत्वाचे म्हणजे या राज्यव्यापी अधिवेशनात परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणाऱ्या अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश असल्याच्या सुचना परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांनी दिल्या आहेत.१४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं देखील आयोजित केली आहेत. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणाऱ्या दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणा-या संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल.



डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.अधिवेशनात राज्य कार्यकारिणी सुध्दा निवडली जाणार असल्याचे मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी आदेशीत केले आहे. डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख केला गेला नाही. ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत. प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे. त्यामुळे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्य पदाधिकारी तसेच जिल्हाध्यक्ष व तालुका अध्यक्ष यांनी सुध्दा आपल्या जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्वांसोबत संपर्क साधावा व सर्वांना सोबत घेऊन जिल्हास्तरीय कार्यकारिणी, तालुका स्तरावर असलेल्या कार्यकारिणी मधील पदाधिकारी व सदस्यांनी या महत्वपूर्ण असलेल्या राज्यव्यापी अधिवेशनात सहभागी व्हावे असे आवाहन देखील डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

## पान ६ वरुन...

### आष्टीच्या मेहकरी धरणात

कर्मचारी यांनी महत्त्वाचे सहकार्य केले. आ.सुरेश धस यांचे परिसरातील ग्रामस्थांकडून आभार मानत समाधान व्यक्त केले. यावेळी नवनाथ जगताप,कानडी खु.सरपंच कारभारी गव्हाणे,घोंगडे वाडी सरपंच भाऊसाहेब घोडके,उपसरपंच बश्री अशोक खराडे,पंडित पोकळे,गणप्रमुख राहुल सुरवसे गणप्रमुख अतुल खराडे,सीताराम झांजे,संजय माळशिखरे, दत्तोबा घोडके, शेख खाजा, अजिनाथ गावडे अनिल माळशिखरे, यांच्यासह कानडी खुर्द पिंपळगाव दाणी, मेहेकरी, पुंडी, वाहिरा येथील ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते या सर्वांच्या हस्ते जलपूजन करून फुले व श्रीफळ अर्पण करून आनंद साजरा करण्यात आला. ‘‘या पाण्यामुळे मेहकरी धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होईल आणि स्थानिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळेल. शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठी केलेल्या या प्रयत्नाचे समाधान मला आहे. समाजाप्रती असलेली जबाबदारी लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रत्येक प्रश्नावर मी सातत्याने ठामपणे उभा आहे. मी मतदार संघातील शेतकऱ्याच्या प्रत्येक प्रश्नासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

### राज्यस्तरीय योगा स्पर्धेचा

योग खेळाडू बीड शहरात दाखल होतील. दि. २३ ऑगस्ट २०२५ वार शनिवार रोजी सकाळी ८ वाजता स्पर्धेला तीन वेगवेगळ्या स्टेजवर सुरूवात होईल. शनिवार २३ ऑगस्ट. २०२५ रोजी सायंकाळी ०४.०० ते ६.०० या वेळेत प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत स्पर्धेचे अधिकृतरित्या उद्घाटन होईल. या उद्घाटन कार्यक्रमात महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय योग खेळाडू सुंदर व आकर्षक योगा डेमो चे सादरीकरण करणार आहेत.उद्घाटन कार्यक्रम नंतर शनिवारी सायंकाळी ६.०० ते ९.०० वाजेपर्यंत स्पर्धा चालेल. रविवारी सकाळी ८.०० ते १.०० या वेळेत स्पर्धा संपन्न होईल. स्पर्धेचे बक्षीस वितरण रविवारी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न होईल. त्यानंतर सायंकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत या स्पर्धेतून ५० व्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवडलेल्या महाराष्ट्राच्या संघाची घोषणा करण्यात येईल. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड मध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर गेल्या दहा वर्षात योग स्पर्धेमध्ये विजयी झालेले खेळाडू येणार असून स्पर्धात्मक योगासने, पाहण्याची सुवर्णसंधी या निमिताने बीड जिल्ह्यातील नागरिकांना मिळणार आहे.बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच योगासनांची राज्यस्तरीय स्पर्धा होत असून या स्पर्धेतून देश पातळीवर होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगासन चँपीयनशिपसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला जाणारा आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या पाल्यांसह या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष श्री. संतोष सोहनी यांनी केले आहे

### नागरिकांचा संताप, आंदोलनाचा इशारा

कचरा, बांधकामाचे अवशेष, तसेच जनावरांचा वावर वाढला आहे. या दुर्दशेमुळे परिसराचे पावित्र्य हरवले असून, हुतात्म्यांचा अपमान होत असल्याची भावना नागरिकांमध्ये प्रबळ झाली असून हे काम न करता मुद्दाम विलंब करत असून ‘‘काम न करता फक्त कागदोपत्री दाखवून बिले वसूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे,’’ असा थेट आरोप नागरिकांनी केला आहे.काम वेळेत पूर्ण न केल्यामुळे गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकणे अपेक्षित होते. मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. उलट प्रशासनाने गुत्तेदारावरच मेहरबानी दाखवल्याचा आरोप होत असून तात्काळ कारवाई झाली नाही तर सामाजिक कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.स्मारकाचे काम तातडीने पूर्ण व्हावे, अन्यथा रस्त्यावर उतरून लढा उभारू, असा इशारा दिला आहे.

### संत संगती मानवी जीवनाचे

धार्मिक कार्याला आज सुगीचे दिवस आल्याचे पाहायला मिळत आहे. या साधुसंताची संगती परिसरा लाभली म्हणून परिसरातील भाविक भक्तांच्या जीवनाचे कल्याण झाल्याचे आपल्याला पाहायला मिळत आहे. म्हणून माणसाने संत संगती केली पाहिजे. संत संगतीतच मानवी जीवनाचे कल्याण असल्याचे प्रतिपादन यावेळी हभप रामाणाचार्य एकनाथ महाराज गाडे यांनी केले आहे. यावेळी हभप.संगीत विशारद गणेश महाराज जरांगे, विकास महाराज जायभाये, माऊली नागरगोजे पत्रकार शंकर भालेकर गजानन नागरगोजे आदींसह मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

### तन्वी खिलारे हिची नाट्य

पातळी ( ) आणि भावनिक जोड दिली होती. केवळ शब्दच नव्हे, तर त्या शब्दांमागील अर्थ आणि भावना तिने उत्तम प्रकारे पोहोचवली. नाटक हे एक सामूहिक कलाप्रकार आहे. तन्वीने इतर सहभागी मुलांशी उत्तम ताळमेळ साधला आणि संपूर्ण नाट्यप्रयोगाला यशस्वी करण्यासाठी एक टीम प्लेयर म्हणून काम केले. ती इतरांच्या संवादांनादेखील एक अभिनेत्री म्हणून उत्सुकतेने ऐकत होती आणि प्रतिसाद देत होती, ज्यामुळे तिचा अभिनय अधिक सजीव झाला. तिने केवळ संवाद रटून सांगितले नाहीत, तर तिने तिच्या भूमिकेचे स्वरूप, तिचे आणि तिची वैशिष्ट्ये यांचा खोलवर अभ्यास केला होता असे जाणवले. हे खोलवरून केलेले अवगतनच तिच्या अभिनयाला प्रामाणिकपणा आणि खोली देत होते.तिचे २४ ऑगस्ट रोजी राज्य स्तरीय स्पर्धा आहे. सर्व क्षेत्रातून तन्वी खिलारे हिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### पिंपळवंडी येथे ४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान



पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग चौथा श्रावणी सोमवार यात्रा उत्सवाचे औचित्य साधून अहिल्यानगर येथील सुरभी रक्तपेढीचे आयोजक डॉ.राजेंद्र पवार यांनी येथे रक्तदान शिबिराचे दि.१८/०८/२०२५ सोमवार रोजी आयोजन केले होते.या उपक्रमाला भाविक-भक्तांनी मोठा प्रतिसाद देत ४२ सदस्यांनी रक्तदान करून रक्तदानाचे कर्तव्य बजावले.यासाठी सुरभी रक्तपेढीचे प्रमुख डॉ.राजेंद्र पवार,शिवम खिलारे,ज्ञानदेव सांगळे, राहुल जरे,सोनिया शितोळे,प्रीती ढोबळे,आदित्य जगताप तसेच पिंपळवंडी येथील स्वराज्य झेप प्रतिष्ठानचे अशोक तात्या पवार, जयदत्त पवार,रमेश पवार यांनी परिश्रम घेतले.यावेळी युवा नेते निलेश मोरे,अर्जून आबा पवार,भारत पवार, नागेश शहाणे,गोकूळ पवार सह पत्रकार बबन उकांडे,भाऊसाहेब पवार आदी उपस्थित होते.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२९५ दिनांक-१८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती महोदेव एकनाथ होनकाडे रा. साडेगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म/मृत्यू दिनांक
१ आरती महोदेव होनकाडे मुलगी ११/०२/२०११

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-१८-८-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३९९ दिनांक-१९/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती पुंजाराम किसनराव देवकर रा. दाढेगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक
१ आकाश पुंजाराम देवकर मुलगा २८/०१/२०००

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# शासन अतिवृष्टिग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी - कृषीमंत्री भरणे

वाशीम : शेतकरी हा आपल्या समाजाचा कणा आहे. शासन संकटात त्याला कधीही एकटे सोडणार नाही. जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याची व्यथा मी प्रत्यक्ष ऐकली आहे. शासन अतिवृष्टिग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी कायम उभे आहे,'' अशी ग्वाही पालकमंत्री व कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

गेल्या चार दिवसांत अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी कृषिमंत्री भरणे जिल्हा दौऱ्यावर होते. रिसोड, मालेगाव, वाशीम तालुक्यांत ठिकठिकाणी भेट देत त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. या वेळी आमदार अमित झनक, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अनिता महाबळे, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. रिसोड तालुक्यातील महागाव, बाळखेड, वाकद, सेलू खडसे, पिंपरखेड, मसलापेन आणि मालेगाव तालुक्यांतील राजुरा गावाला भेट दिली. त्यांनी शेतात जाऊन पिकांचे झालेले नुकसान पाहिले व शेतकऱ्यांच्या समस्या कृषिमंत्र्यांनी जाणून घेतल्या. ''प्रत्येक नुकसानीची तपशीलवार नोंद घ्यावी.

उभ्या पिकांचे, घरांचे व सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. नुकसान भरपाई त्वरित मिळवून दिली जाईल,'' असे श्री. भरणे म्हणाले. या वेळी लोकप्रतिनिधी, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## साखळी पिक पद्धती : कमी वेळेत अधिक उत्पादन



शेतकऱ्यांसाठी पीक पद्धतीची निवड खूप महत्त्वाची असते. विविध पिक पद्धती शेतातील उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी आणि संसाधनांचा योग्य वापर करण्यासाठी उपयुक्त असतात. त्यापैकी एक महत्त्वाची पद्धत म्हणजे साखळी पिक पद्धत.

साखळी पिक पद्धत म्हणजे काय?

साखळी पिक पद्धतीमध्ये पहिले पीक कापणीपूर्वी किंवा काढणीपूर्वी दुसरे पीक पेरले जाते. म्हणजेच, पहिल्या पिकाच्या काढणीचा पूर्वीच दुसऱ्या पिकाची लागवड केली जाते. यामुळे दोन्ही पिकांच्या वाढीला फायदेशीर वातावरण मिळते. विशेषतः, पहिल्या पिकाने जमिनीत जो ओलावा ठेवलेला असतो, त्या ओलाव्याचा फायदा दुसऱ्या पिकाला मिळतो, ज्यामुळे त्याची वाढ जलद होऊ शकते.

साखळी पिक पद्धतीचे फायदे :ओलाव्याचा योग्य वापर होतो. पहिल्या पिकात जो ओलावा असतो, तो दुसऱ्या पिकासाठी उपयोगी पडतो. त्यामुळे अतिरिक्त पाणी देण्याची आवश्यकता कमी होते, आणि दुसऱ्या पिकाची अधिक चांगली वाढ होते. पाणी व्यवस्थापन करता येते. जर शेतकऱ्याकडे पाण्याची उपलब्धता असेल, तर साखळी पिक पद्धतीमध्ये दुसऱ्या पिकाची लागवड योग्य वेळी केली जाऊ शकते. यामुळे पाण्याचा योग्य वापर होतो आणि उत्पादन क्षमता वाढवता येते. वेळेची बचत होते. दुसऱ्या पिकाचा कालावधी प्रथम पिकाच्या तुलनेत कमी असतो. त्यामुळे अधिक जलद उत्पादन प्राप्त करण्याचा फायदा मिळतो, आणि त्यात वेळेची देखील बचत होते. साखळी पिक पद्धतीने शेतकऱ्यांना विविध प्रकारची पिके एकाच शेतात लावता येतात, ज्यामुळे आर्थिक परतावा अधिक होतो. या पद्धतीत ओलाव्याचा वापर चांगल्या प्रकारे होतो, ज्यामुळे सिंचनाची आवश्यकता कमी होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी कमी वापरता येते आणि त्यांचा खर्च कमी होतो.कापूस आणि सोयाबीन :कापूस काढणीपूर्वी, सोयाबीनाची लागवड केली जाऊ शकते. कापूस काढल्यावर ज्या जमीन मध्ये ओलावा असतो, त्याचा फायदा सोयाबीनला होतो.तांदूळ आणि भाजीपाला :तांदुळ काढणी झाल्यावर भाजीपाला (पालक, मेथी, कोथिंबीर) लावता येतो. तांदुळाच्या पिकामुळे जमीन ओलसर असते, ज्यामुळे भाजीपाला लवकर वाढतो आणि उत्पादन अधिक मिळवता येते.

बटाटा आणि टोमॅटो :बटाटा काढणीपूर्वी टोमॅटो किंवा इतर भाज्यांची लागवड केली जाऊ शकते. बटाटा काढल्यानंतर टोमॅटोसाठी पर्यायी जमीन तयार होते, ज्यामुळे त्याच्या उत्पादनाला वाव मिळतो. साखळी पिक पद्धती शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत फायदेशीर पर्याय आहे, ज्यामुळे पीक उत्पादन वाढवण्यास मदत होते. यामध्ये ओलाव्याचा उत्तम वापर, जलवर्धनाची कमी आवश्यकता, आणि कमी काळात अधिक उत्पादन मिळवणे यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारू शकते. तरीही, शेतकऱ्यांनी स्थानिक हवामान, जमीन प्रकार आणि पिकांच्या गरजांनुसार योग्य पिकांची निवड करणे महत्त्वाचे आहे. या पद्धतीचा वापर शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अधिक नफ्याच्या दिशेने नेण्यास मदत करेल.

## यांत्रिकीकरण, स्वच्छ कापूस उत्पादनावर संशोधन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठामध्ये कपाशीमध्ये लागवड ते वेचणी पर्यंत यांत्रिकीकरण व स्वच्छ कापूस उत्पादन संशोधन प्रकल्प अंतर्गत राबविला जात आहे. त्यासाठी यंदा (२०२५) परभणी येथील मध्यवर्ती प्रक्षेत्रावर ५०० एकर सघन पद्धतीने कपाशीची लागवड करण्यात आली आहे.

या प्रकल्पांतर्गत प्रामुख्याने कपाशीमध्ये लागवड ते वेचणीपर्यंतच्या कामांचे यांत्रिकीकरण यावर संशोधन करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कपाशीच्या एनएच १९०१, एनएच १९०२ आणि खासगी कंपनीच्या ३ वाणांची सघन पद्धतीने ९० बाय १५ सेंमी., ९० बाय १२ सेंमी., ९० बाय ९ सेंमी. या ३ अंतरावर लागवड करण्यात आली आहे. स्वच्छ कापूस वेचणी करिता पानगळ करणाऱ्या रसायनाचा वापर, योग्य अंतर यावर संशोधन करण्यात येत आहे.



कुलगुरू डॉ. इंद्र मणी मिश्रा, अमरावती येथील नियोजन विभागाच्या उपआयुक्त कावेरी नखले, अधीक्षक कृषी अधिकारी नीलेश ठोंबरे, महाराष्ट्र राज्य सल्लागार ऋषभ माहेश्वरी, मध्यवर्ती प्रक्षेत्राचे प्रभारी अधिकारी डॉ. विलास खर्गखराटे, वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे, मृद् व कृषी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. हरिहर कौसडीकर, नांदेड येथील कापूस संशोधन केंद्राचे कृषिविद्यावेत्ता डॉ. अरविंद पांडागळे, कीटकशास्त्रज्ञ डॉ. बस्वराज भेदे उपस्थित होते. या वेळी कपाशीच्या बियाणे उत्पादनात वाढ करण्यासाठी 'बियाणे ते बियाणे' यांत्रिकीकरण (सीड टू सीड मेकानायझेशन) तसेच कमी खर्चाचे तंत्रज्ञान यावर सविस्तर चर्चा झाली. सघन पद्धतीने कपाशी लागवड तंत्रज्ञान भविष्यात कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

## केळीवरील पनामा रोग, असा करा बंदोबस्त

केळीच्या पिकाला पनामा नावाच्या बुरशीमुळे होणाऱ्या रोगाचा मोठा धोका असतो. जो एकदा शेतात आल्यास ३० वर्षांपर्यंत मातीतून जात नाही. या रोगाला फ्युजेरियम विल्ट असेही म्हणतात.पनामा रोग उष्णकटिबंधीय प्रदेशांमध्ये केळीच्या लागवडीसाठी एक मोठा धोका आहे. पनामा रोगाची लक्षणे आणि प्रसारफ्युजेरियम ऑक्सिस्पोरम ही बुरशी केळीच्या कोवळ्या मुळांवर किंवा मुळांच्या तळावर हल्ला करते. यामुळे मुळांच्या गाठी आणि पानांच्या तळांवर वेगाने हल्ला होतो. ज्या शेतात या रोगाचा प्रादुर्भाव होतो, त्या शेतकऱ्यांनी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

पनामा रोगामुळे काय होते :पानांचे अचानक वाळणे व गळणे मुळांवर गाठी व सडखोडामध्ये तपकिरी पट्टे दिसतात. हा आजार मातीतून व पाण्याद्वारे संक्रमित होतो. एकदा शेतात आल्यास रोग ३० वर्षांपर्यंत मातीत राहतो.




पनामा रोगापासून बचावासाठी उपाययोजना : रोगमुक्त रोपांची निवड करारवी. विश्वसनीय स्त्रोतांकडूनच रोपे खरेदी करावीत. शेतामधील निचरा सुधारावा. पाणी साचणार नाही याची काळजी घ्या. फेरपालट करा. एकाच जमिनीत सतत केळी न लावता अन्य पिके घ्यावीत. संसर्ग झालेला भाग वेगळा करावा. रोगट झाडे उखडून नष्ट करावीत. जमिनीची स्टीमिंग / सौर निर्जंतुकीकरण शक्य असल्यास करावे.

## रताळ्याच्या लागवडीतून मिळते चांगले उत्पन्न; जाणून घ्या लागवड पद्धत

भारतीय शेतकरी आता पारंपारिक शेती सोडून अपारंपारिक शेतीकडे जात आहेत आणि त्यात यशस्वीही होत आहेत. शेतकरी रताळ्यांसह अनेक प्रकारची फळे आणि भाज्यांची लागवड करतात. रताळे हे दिसायला आणि चवीला बटाट्यासारखे आहे, पण त्यात बटाट्यापेक्षा जास्त गोडवा आणि स्टार्च आहे. याशिवाय रताळ्यामध्ये जीवनसत्त्वेही चांगल्या प्रमाणात आढळतात. याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यामुळे चेहऱ्यावर चमक येते आणि केसांची वाढ होते. रताळे लागवडीमुळे शेतकऱ्यांना चांगला नफा मिळू शकतो.

रताळे लागवडीची वेळ :रताळ्याची लागवड हे सदाहरित पीक आहे. ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांना वर्षभर मिळू शकते. पण चांगल्या उत्पादनासाठी उन्हाळ्यात आणि पावसात लागवड केली जाते. शेतकरी जून ते ऑगस्ट दरम्यान त्याची रोपे लावतात. त्याच वेळी खरीप हंगामातील पिकासह त्याचे पीक तयार होते. डिसेंबर-जानेवारी महिन्यात धानाची दुसरी कापणी झाल्यानंतर शेतकरी पेरणी करतात.

रताळ्याच्या सुधारित जाती :रताळ्याच्या ४०० हून अधिक जाती असल्या तरी देशातील बहुतांश शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या जातींमध्ये पुसा गोल्डन, पुसा व्हाईट, कोकण अश्विनी, राजेंद्र



गोड बटाटा-५, काळमेघ, श्री रत्न क्रॉस-४, श्रीभद्र या जातींचा समावेश आहे. श्री अरुण, श्री वरुण, श्री वर्धिनी, श्री नंदिनी आणि वर्षा यांचा समावेश आहे. रताळ्याच्या या सुधारित जाती ११० ते १२० दिवसांत तयार होतात.

रताळ्याच्या लागवडीसाठी हवामान आणि माती :रताळ्याच्या लागवडीसाठी चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. जी सेंद्रिय घटकांनी समृद्ध आहे. त्याच्या लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ५.८ ते ६.७ च्या दरम्यान असावी. रताळ्याच्या लागवडीसाठी सौम्य आणि समशीतोष्ण हवामान सर्वात योग्य आहे. त्याच्या लागवडीसाठी सर्वात योग्य तापमान २१ ते २७ अंश सेल्सिअस आणि पर्जन्यमान ७५ ते १५० सेंटीमीटर असावे.

रताळ्याची लागवड पद्धत :रताळ्याची लागवड करण्यासाठी प्रथम माती फिरवणाऱ्या नांगराने शेत नांगरून घ्यावे. काही दिवस उघडे सोडा जेणेकरून जमिनीतील कीटक, जुने पिकांचे अवशेष आणि तण नष्ट होतील. हेक्टरी १८० ते २०० क्विंटल कुजलेले शेणखत शेतात टाकावे लागेल. यानंतर रोटाव्हेटरच्या सहाय्याने शेताची २ ते ३ वेळा नांगरणी करून माती भुसभुशीत करावी लागते. शेत तयार झाल्यानंतर, रताळे पेरा, त्याची रोपे रोपवाटिकेत तयार केलेल्या कलमांच्या स्वरूपात लावली जातात. रोपे एक महिना अगोदर तयार केली जातात, रोपवाटिकेत बिया पेरून द्राक्षांचा वेल तयार केला जातो. वेल उपटून, तिची छाटणी करून शेतात लावली जाते. इतर वनस्पतींपासून त्याच्या रोपांचे अंतर सुमारे एक फूट असावे. रताळ्याच्या रोपांची २० सेमी खोलीवर पेरणी करावी. झाडे लावल्यानंतर ते सर्व बाजूंनी मातीने झाकले पाहिजे. हे सपाट जमिनीवर लावले जाते, म्हणून बेडमध्ये ओळी लावल्या जाऊ शकतात. ओळीपर्यंतचे अंतर सुमारे २ फूट ठेवावे.

रताळ्याच्या शेतीतून नफा : रताळ्याच्या सुधारित वाणांची योग्य कृषी पद्धती वापरून लागवड केल्यास त्यातून चांगला नफा मिळू शकतो. एका अंदाजानुसार, एक हेक्टरमध्ये रताळ्याची लागवड केल्यास त्यातून सुमारे २५ टन उत्पादन मिळू शकते. बाजारात रताळ्याचा भाव १० रुपये किलो किंवा त्याहून अधिक आहे. जर तुम्ही २५ टन रताळे विकले तर तुम्ही २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त कमवू शकता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३९ : ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ने मद्रास (आताचे चेन्नई) शहराची सुरवात केली.
१८४८ : अमेरिकेने न्यू मेक्सिको हा प्रांत ताब्यात घेतला.
१८९४ : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांविरुद्धच्या भेदभावाविरुद्ध लढ्यासाठी नाताळ भारतीय काँग्रेसची स्थापना केली (संस्थापक चित्रीत).
१९०२ : कॅडिलॅक मोटर कंपनीची स्थापना
१९०२ : मोटार वाहना मध्ये फिरणारे थिओडोर रूझवेल्ट हे अमेरिकेचे पहिले राष्ट्रपती होते.
१९२१ : महात्मा गांधी यांनी विदेशी वस्त्राची होळी पेटवली.
१९४१ : दुसरे महायुद्ध जर्मन सैन्याने लेनिनग्राडला वेढा घातला.
१९४२ : दुसरे महायुद्ध ब्राझिलने जर्मनी व इटालीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४४ : दुसरे महायुद्ध सोविएत युनियनने रोमानिया जिंकले.
१९६२ : फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स द गॉल यांची हत्या करण्याचा कट फसला.
१९७२ : वर्णद्वेषी धोरणाबद्दल र्होडेशिया (झिम्बाब्वे) ची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीतुन हकालपट्टी करण्यात आली.
२०१८ : भारतीय नेमबाज राही सरनोबत यांनी २५ मीटर पिस्तूल शूटिंगमध्ये सुवर्णपदक मिळवून आशियाई खेळांच्या नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. अशी कामगिरी करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४७ : प्रेशर कुकर चे निर्माते डेनिस पेपिन यांचा जन्म. (मृत्यू: २६ ऑगस्ट १७१३)
१७६० : पोप लिओ बारावा.
१८४८ : शिकागो डेली न्यूज चे स्थापक मेलविले एलिया स्टोन यांचा जन्म. (मृत्यू: १५ फेब्रुवारी १९२९)
१८७७ : पाश्चात्य भारतीय संस्कृतीचे प्रारंभिक भाषांतरकार,इतिहासकार आणि भारतीय कलेचे तत्त्वज्ञ आनंद केंटिश कुमारस्वामी यांचा जन्मदिन.
१८९३ : अमेरिकन लेखक डोरोथी पार्कर यांचा जन्म.
१९०४ : डेंग जियाओ पिंग सुधारणावादी चिनी नेते (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९९७)
१९१५ : शंभू मित्रा बंगाली रंगभूमीवरील अभिनेते, दिग्दर्शक व नाटककार (मृत्यू: १९ मे १९९७)
१९१५ : इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे रचनाकार जेम्स हिलियर यांचा जन्म. (मृत्यू: १५ जानेवारी २००७)
१९१८ : डॉ. बानू कोयाजी कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणार्या सामाजिक कार्यकर्त्या. त्यांना पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, रामेश्वरदास बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार, पुण्यभूषण पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लेटर्स (१९५५) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुण्यातील के. इ. एम. रुग्णालय, जहांगीर नर्सिंग होम, दैनिक सकाळ, इंडिया फांउंडेशन इ.संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. (मृत्यू: १५ जुलै २००४)
१९१९ : गिरीजाकुमार माथूर साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक लेखक व कवी (मृत्यू: १० जानेवारी १९९४)
१९२० : डॉ. डेंटन कूली हृदयरोपण शस्त्रक्रियेचा पाया घालणारे अमेरिकन शल्यविशारद
१९२४ : भारतीय आधुनिक हिंदी साहित्याचे प्रख्यात व्यंगचित्रकार आणि विनोदी लेखक हरिशंकर परसाई यांचा जन्मदिन.
१९३५ : पंडित गोपीकृष्ण कथ्थक नृत्यशैलीचे बनारस घराण्याचे नर्तक, नृत्यदिग्दर्शक व अभिनेते. भरतनाट्यम, कथकली, मणिपुरी आदी नृत्यप्रकारांतही त्यांनी नैपुण्य मिळवले होते. १९५७ मध्ये त्यांनी ८२ दिवसांत ८७ कार्यक्रम करुन विक्रम केला. (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९४)
१९५५ : चिरंजीवी भारतीय चित्रपट अभिनेते, राजकारणी व माजी भारतीय पर्यटन मंत्री
१९६४ : मॅट्स विलँडर स्वीडीश टेनिस खेळाडू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : फिलिप (सहावा) फ्रान्सचा राजा (जन्म: ?? १२९३)
१६०७ : लंडन कंपनीची स्थापक बर्थलॉम्व गोस्नेल यांचे निधन.
१८१८ : वॉरन हेस्टिंग्ज भारताचा पहिला गव्हर्नर जनरल (जन्म: ६ डिसेंबर १७३२)
१९६७ : जन्म नियंत्रण गोळीचे निर्मिते ग्रेगरी गुडविन पिंटस यांचे निधन. (जन्म: ९ एप्रिल १९०३)
१९७८ : जोमो केन्याटा केनियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: २० आक्टोबर १८९३)
१९८० : चित्रपट अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक किशोर साहू यांचे बँकॉक विमानतळावर विमानात चढत असताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन (जन्म: २२ नोव्हेंबर १९१५)
१९८० : मॅकडोनेल विमानाचे निर्माते जेम्स स्मिथ मॅकडोनेल यांचे निधन. (जन्म: ९ एप्रिल १८९९)
१९८२ : एकनाथजी रामकृष्ण रानडे क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक व कन्याकुमारी येथील विवेकानंद शिला स्मारकाचे शिल्पकार. अधिकाधिक लोकांचा सहभाग असावा म्हणून मोठमोठ्या देणग्या जमा न करता एक एक रुपया जमा करुन त्यांनी विवेकानंद स्मारकाचे प्रचंड काम उभे केले आहे. (जन्म: १९ नोव्हेंबर १९१४)
१९८९ : पं. कृष्णराव शंकर पंडित ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक. राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी त्यांचा 'राष्ट्रीय गायक' म्हणून गौरव केला होता. (जन्म: २६ जुलै १८९३)
१९९५ : पंडित रामप्रसाद शर्मा संगीतकार, ट्रम्पेट व व्हायोलिनवादक. 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' याजोडीतील प्यारेलाल यांचे ते वडील होत. (जन्म:)
१९९९ : सूर्यकांत मांडरे मराठी चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते, पद्मश्री (१९७३). त्यांच्या 'धाकटी पाती' या आत्मचरित्राला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२०१४ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार यू. ए. अनंतमूर्ती यांचे निधन. (जन्म: २१ डिसेंबर १९३२)
२०१८ : गुरुदास कामत , भारतीय राजकीय नेते (जन्मतारीख: ५ ऑक्टोबर, १९५४)

# जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा - डॉ. मेटे

बीड। प्रतिनिधी

आमागील तीन दिवसापासुन जिल्ह्यात सतत पर्जन्यवृष्टी होत आसुन हजारो हेक्टर पीक क्षेत्र बाधीत झाले आहे. शासनाने घरांचे नुकसान, जिवीत हानी, पशुधन व शेतीचे नुकसान भरपाईचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले असल्याने आपण महसुल यंत्रणेकडून अतिशीघ्र महसुल मंडळनिहाय पाहणी करून नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कडे केली आहे.




जिल्ह्यात पावसामुळे हजारो हेक्टरवरील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची सरकारने दखल घेतली आहे. त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच सरकार मदत देणार असल्याची घोषणा केली आहे. यासाठी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना नुकसानाचे पंचनामे करून तात्काळ अहवाल देण्यास सांगितले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि प्रशासनाने जिल्ह्यातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्याचा अहवाल तातडीने सादर करावा अशी मागणी यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी केली आहे.

याप्रसंगी शिवसंग्राम जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, तालुकाध्यक्ष पंडितराव माने, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, मनोज जाधव,शेख आबेद, ज्ञानेश्वर कोकाटे, दादा गोंदावले, प्रा.पंडित शेंडगे, मंगेश माने आदी सह शेतकरी व शिवसंग्रामचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे, योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०२३-२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत खेळाडू (०१ पुरूष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू) असे एकुण ०४ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आहेत. २०२२ नुसार सन २०२३-२४ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. ०१ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ०५ (पाच वर्षापैकी ०२ (दोन) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असावे.खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधील पुरस्कार वर्षांच्या लगतपूर्व ०५ ( पाच वर्षातील राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वरिष्ठ, कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा, शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल यापैकी उत्कृष्ट ठरणाऱ्या ०३ वर्षाच्या कामगिरीचा विचार गुणांकण कोष्ठकामध्ये करण्यात येईल. खेळाडूने स्पर्धांच्या मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सोबत सादर करणे आवश्यक आहे. खेळाडूंचा अर्ज अधिकृत जिल्हा संघटने मार्फत शिफारसीसह सादर करणे आवश्यक आहे. अपवादात्मक परिस्थीतीत खेळाडू वैयक्तीकरित्या अर्ज सादर करू शकतील. एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स, जागतीक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट). जागतीक चषक क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट), आशियाई अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट). राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट), युथ ऑलिंपीक गेम्स, युथ कॉमनवेल्थ गेम्स, युथ जागतिक आजिंक्यपद । युथ जागतिक चषक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत सहभागी खेळाडूस २०२३-२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार थेट देण्यात येईल.क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणाऱ्या सन २०२३-२४ वर्षात वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरीष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदकविजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील. अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक पात्र असेल. विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमूण्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आलेला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या मार्गदर्शक व क्रीडा पटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, मो. ९६०४९५९६७८ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीड अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

## बीज भांडवल योजनेसाठी बेरोजगार युवक-युवतींनी अर्ज सादर करावेत

बीड। प्रतिनिधी

विशेष घटक योजना (२०२५-२०२६ मध्ये साध्य झालेले लक्ष्य ८० लाभार्थी) स्वरूप:- प्रकल्प मर्यादा रु. ५००००/- पर्यंत.प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते व राहिलेली ५० टक्के रक्कम बँके मार्फत देण्यात येते. उदा. (२५ हजार अनुदान २५ हजार बँक रक्कम बँक कर्जावर बँकेच्या नियमा प्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधरणपणे ३ वर्षात करण्याची आहे. बियाणे भांडवल योजना (२०२५-२०२६ उदिष्ट ८० लाभार्थी स्वरुप प्रकल्प मर्यादाः ०५ लाखापर्यंत प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १०,०००/- चा समावेश आहे.

बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज दर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवुन दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या आत करावी लागते. अर्जदारास ५ टक्के स्वतः चा सहभाग भरावयाचा आहे. थोडक्यात बँक रक्कम ७५ टक्के महामंडळ २० टक्के व अर्जदाराचा सहभाग ५ टक्के एकुण १०० टक्के .. या संकेतस्थळावर ऑनलाईन कर्ज मागणी अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

## अमृत मेळाव्याचा तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

माजलगाव येथे दि. २३ ऑगस्ट रोजी भव्य 'अमृत मेळावा'शिक्षण, कौशल्य आणि व्यवसाय संधींचा अद्वितीय संगम माजलगाव (जि. बीड) महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने शनिवार, २३ ऑगस्ट २०२५रोजी सकाळी १० वाजता वैष्णवी मंगल कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्राचे' आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यात ब्राह्मण, मारवाडी, आर्य वैश्य (कोमटी), गुजराती, राजपूत, माहेश्वरी, राजपुरोहित, सिंधी, बनिया, बंगाली, पाटीदार आदी खुल्या प्रवर्गातील समाजासाठी अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, कौशल्य विकास आणि उद्योग उभारणीसाठीच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे.

### जाहिर प्रगटन
### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अंबड ता. अंबड जि जालना

E-Mail ID: tahshildarambad@gmail.com
दुरध्वनी क्रमांक /.०२४८३२२००२६
जा.क्र.२०२५ / जमा-२ /काबी-६१
दिनांक- १८/०८/२०२५

सर्व जनतेर जाहीर प्रकटन देऊन कळविण्यात येते कि, मौजे, बारसवाडा ता. अंबड जि. जालना येथील सर्व नं. ७१ मधील १८ गुंठे जमीन वारसाने कोंडीराम सोनाजी जायगुडे यांच्या नावे होणे बाबत दिनांक. २८/०८/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता ठेवण्यात आली आहे. तरी सदर तारखेस आपण स्वतः किवा वकिलामार्फत दाखल करावयाच्या पुराव्यासह तहसिल कार्यालय अंबड येथे हजर राहावे सदर तारखेस आपण गैरहजर राहीलात तर आपणाला काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून एकतर्फी निर्णय देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत
तहसीलदार,अंबड

### जाहिर प्रगटन
### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २३६/२०२५**
**जयराम रामकिसन सपकाळ विरुद्ध**
**ग्रा.पं. कार्यालय अवलपुर/सोनगाव**

पहा

१.जयराम रामकिसन सपकाळ रा. अवलपुर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक जयराम रामकिसन सपकाळ यांचा दिनांक २५/१२/१९८२ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/नगर परिषद कार्यालय अवलपुर/सोनगाव ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय अवलपुर/सोनगाव ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी. आज रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २६/०८/२०२५ ही आहे

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड

### जाहिर प्रगटन
### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २६२/२०२५**
**राम पि. दगडू खांडे विरुद्ध**
**ग्रा.पं. कार्या पिंपळगाव (मंजरा)**

पहा

१.राम दगडु खांडे, रा. पिंपळगाव (मंजरा) ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक राम दगडू खांडे यांचा दिनांक ०४/०४/१९७४ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस पिंपळगाव (मंजरा) ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे पिंपळगाव (मंजरा) ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १९/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०९/२०२५ ही आहे

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-३१९**
**दिनांक -२०/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती ईश्वर दादासाहेब शिंदे रा.अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रंजित ईश्वर शिंदे | मुलगी | २९/०१/२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-३२०**
**दिनांक -१०/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती ईश्वर दादासाहेब शिंदे रा.अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आकाश ईश्वर शिंदे | मुलगी | ०४/१०/२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-१९१**
**दिनांक -०७/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती संगिता चंद्रमनी उघडे रा.डावरगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अर्चना चंद्रमनी डघडे | मुलगी | १६/१०/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०७/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-२९९**
**दिनांक -१८/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती ईश्वर दादासाहेब शिंदे रा.अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मी ईश्वर शिंदे | मुलगी | २८/०७/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-२०२**
**दिनांक -१२/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती किरण बबनराव शिंदे रा.कुक्कडगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | साई किरण शिंदे | मुलगा | ०५/१०/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१२/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-३२३**
**दिनांक -१८/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती संगिता केशव गावड रा.वडिगोद्री ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या पती च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | केशव रामभाऊ गावडे | पती | १०/०६/२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-२९८**
**दिनांक -१८/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती डिगांबर सिद्धू शिंदे रा.अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सचिन डिगांबर शिंदे | मुलगा | ०५/०१/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा.क्र.२०२५/ सेतु/कावि-३६५**
**दिनांक -१९/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रामहरी साहेबराव सवासे रा. साष्ट पिंपळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मनिषा रामहरी सवासे | मुलगी | ०१/०८/२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

राज्य लोकतंत्र
शुक्रवार, दि.२२ ऑगस्ट २०२५


# आष्टीच्या मेहकरी धरणात पाणी पोहोचले

## शेतकऱ्यांकडून जलपूजन : आ.धस यांचे मानले आभार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर येताना दिसत आहे. आमदार सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मेहकरी मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून आज सकाळी ९.४५ वा.सीना मध्यम प्रकल्पातून दोन्ही पंपाद्वारे सुमारे १६० क्यूसेक पाणी सोडले गेले असता प्रत्यक्ष पाणी मेहकरी मध्यम प्रकल्पात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी जलपूजन करून आनंद व्यक्त करत आ.सुरेश धस यांचे आभार मानले.



यंदा सीना मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असुन परिणामी अतिरिक्त पाणी नदीद्वारे वाहून जात होते.या पार्श्वभूमीवर आष्टी मतदारसंघाला या पाण्याचा लाभ मिळावा, यासाठी आमदार धस यांनी सातत्याने पाठपुरावा करून त्यास प्रतिसाद देत प्रशासनाने तातडीने आवश्यक तांत्रिक प्रक्रिया व दुरुस्ती पूर्ण करून याशिवाय थकीत असलेले ३६ लाख ८४ हजार रुपयांचे वीजबिलही भरले गेले. मेहकरी धरणात पाणी सोडण्याचा मार्ग मोकळा झाल्याने गुरुवारी दि.२१ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष पाणी मेहकरी मध्यम प्रकल्पात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी जलपूजन करून आनंद व्यक्त केला.

या संपूर्ण प्रक्रियेत पुणे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ गुनाळे,कार्यकारी अभियंता धाराशिव मध्यम प्रकल्प विभाग,धाराशिव, कार्यकारी अभियंता उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर, कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग, बीड, कार्यकारी अभियंता सीना मध्यम प्रकल्प, उपकार्यकारी अभियंता पालवनकर, उपअभियंता आडे तसेच विद्युत व यांत्रिकीकरण विभागातील अधिकारी व

पान ३ वर

# तोतया पोलिसांनी अंगठ्यासह गळ्यातील लॉकेट केले लंपास

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरात तोतया पोलिसांनी सेवा निवृत्त मुख्याध्यापकाच्या बोटातील दोन सोन्याचे अंगठ्या व गळ्यातील सोन्याची चैन घेऊन पळून गेले.

अंबड शहरात भरदिवसा दोन तोतया पोलिसांनी सेवानिवृत्त मुख्याध्यापकाला लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भामट्यांनी तब्बल २ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले असून, या घटनेमुळे अंबड शहरात सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी शिक्षक बँक कर्मचारी पोलीस खात्यातील कर्मचारी यांच्यामध्ये घबराटीचे वातावरण पसरली आहे. मत्स्योदरी हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक उत्तमराव विठ्ठलराव शिंदे (वय ७२) हे साडेपाच वाजेच्या सुमारास जालना रोडवरील एका किराणा दुकानातून सामान खरेदी करून त्यांच्या स्कुटीवरून घरी जात होते. त्याचवेळी मोटारसायकलवरून आलेल्या दोन इसमांनी त्यांना अडवून ''आम्ही पोलीस आहोत, चोरीच्या प्रकरणात वाहने तपासणी सुरु आहे'' असे सांगून तपासणीस सुरुवात केली.

यावेळी त्या इसमांनी शिंदे यांना फसवणुकीच्या पद्धतीने खिशातील औषधे, रोख ५०० रुपये, घड्याळ तसेच हातातील दोन सोन्याच्या अंगठ्या आणि गळ्यातील लॉकेट एका रुमालात बांधण्यास सांगितले. मात्र घरी गेल्यावर रुमाल उघडून पाहिल्यानंतर त्यात सोन्याचे दागिने नसल्याचे लक्षात आले.तत्काळ शिंदे यांनी अंबड पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात दोन भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सपोनि. अमोल गुर्ले करीत आहेत. या घटनेमुळे वृद्ध नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# राज्यस्तरीय योगा स्पर्धेचा जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा - संतोष सोहनी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र योग असोसिएशन, बीड डिस्ट्रीक्ट.योग असोसिएशन व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग, बीड यांच्या, संयुक्त विद्यमाने बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी. बीड येथे दि. २३, २४ ऑगस्ट २०२५ रोजी ४४ व्या राज्यस्तरीय योगा स्पोर्टस चँपियनशीप २०२५ चे आयोजन केले गेले आहे. स्पर्धात्मक योगासनांचा बीड जिल्ह्यात प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने बीड जिल्ह्यात पहिल्यांदाच अशा राज्य स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.तरी बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या परिवारासह सदरील स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष श्री संतोष सोहनी यांनी केले आहे.




म्हैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगा चँपियनशीप स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ, बीड येथे होणाऱ्या ४४ व्या राज्य स्तरीय योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धा मधून निवडला जाणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात झालेल्या जिल्हास्तरीय योगा स्पर्धेत आपापल्या गटामध्ये पहिले तीन क्रमांक मिळालेले मुले, मुली ,महिला, पुरुष खेळाडू या स्पर्धेसाठी स्पर्धक म्हणून बीड शहरात येणार आहेत.

बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी. आकाशवाणी समोर, बीड येथे ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. दि. २२ ऑगस्ट.वार शुक्रवार रोजी सायंकाळी ०४ नंतर पान ३ वर

# आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संपाला बीड जिल्हा आशा वर्कर्स व गटप्रवर्तक युनियनचा पाठिंबा

माजलगाव । प्रतिनिधी

दहा वर्षे सेवा पुर्ण झालेल्या आरोग्य कर्मचार्यांना नियमित शासन सेवेत समायोजन करावे,बदली धोरण, वेतनवाढ,आरोग्य व अपघात विमा आदी मागण्यांसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी, कर्मचारी एकत्रिकरण समितीच्या वतीने दि.१९ ऑगस्ट पासुन सुरु असलेल्या संपाला बीड जिल्हा आशा वर्कर्स व गटप्रवर्तक युनियनने पाठिंबा दिला आहे.



दहा वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचार्यांचे १०० टक्के समायोजन व प्रत्येक वर्षी ३० टक्के याप्रमाणे सा.आरोग्य विभाग,ग्राम विकास, नगर विकास,वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागात समावेश करावा आदी मागण्यांसाठी आरोग्य कर्मचार्यांनी मंगळवार दि. १९ ऑगस्ट पासुन बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे. या कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करून त्यांना न्याय द्यावा अशी मागणी करुन या आंदोलनाला बीड जिल्हा आशा वर्कर्स व गटप्रवर्तक युनियनचा पाठिंबा असल्याचे युनियनचे अध्यक्ष शिवाजी कुरे व सरचिटणीस किरण सावजी यांनी दिलेल्या पाठिंबा पत्रात म्हटले आहे.

# मोठेवाडी शिवारात पिक नुकसानीचे पंचनामे




माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी शिवरात गेल्या ५ ते ६ दिवसांपासून सततच्या संततधार पावसामुळे १ हजार ३०० हेक्टर क्षेत्रा वरील नुकसान झालेल्या कापुस,तुर, सोयाबीन,मुग, उडीद पिकांचे पंचनामे दि २० ऑगस्ट बुधवार व दि २१ ऑगस्ट गुरूवार रोजी करण्यात आले.

गेल्या ५ ते ६ दिवसांपासून पडणाऱ्या संततधार पावसामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शासनाने महसुली व कृषी विभागाला पंचनामे करण्याचे आदेश दिल्यानंतर महसुली व कृषी विभागाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी शिवारातील १ हजार ३०० हेक्टर क्षेत्रावरील नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे दि २० ऑगस्ट बुधवार व दि २१ ऑगस्ट गुरुवार रोजी दोन दिवसांत करण्यात आले.यावेळी पिक नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी कृषी सहायक संदीप नलबले,तलाठी सचिन बडे, ग्रामसेवक बिभीषण डोरले,माजी सरपंच अविनाश गोंडे, महसुल सेवक गणेश खेत्री,राहुल सुरवसे,सुदर्शन हिवरकर,गणेश सर्जे,संजय रोकडे, यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे केले.यावेळी परिसरातील शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती होती. शासनाने शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी मोठेवाडी शिवारातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# डॉ. रज्जाक सय्यद यांच्या दोन्ही लेकी बनल्या डॉक्टर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धानोरा गावातील डॉ. सय्यद गेल्या अनेक वर्षांपासून सर्व सामान्य जनतेच्या आरोग्याची काळजी घेत पैसे असो किवा नसो फक्त सेवा देण्यासाठी अहोरात्र धडपड करणाऱ्या धानोरा सारख्या ग्रामीण भागातील माणसातील देव माणूस असलेला डॉ. रज्जाक सय्यद याच्या दोन्ही मुली एमबीबीएस बनल्या आहेत. त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जीवन हॉस्पिटलचे संचालक डॉ. रज्जाक सय्यद यांनी कोरोना काळात अनेक रुग्णांचा जीव वाचवला त्याची पोहोच पावती म्हणून दोन्ही मुली डॉक्टर झाल्या आहेत. अलिशा सय्यद हीचा काही वर्षापूर्वी अपघात झाला होता, एक पायाचं ऑपरेशन झालं, परंतु न खचता, न डगमगता, तिने जिद्द, चिकाटी, मेहनत, अभ्यास या जोरावर एवढ्या मोठ्या बलाढ्य दुःखावर मात करत, आज डॉ. रज्जाक सय्यद यांची मुलगी अलिशा रज्जाक सय्यद हिची चइइड साठी महाराष्ट्रात नामांकित शासकीय बी. जे वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथे निवड झाल्याबद्दल तिचा सन्मान करताना सभापती अंकुश चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते अन्सार भाई शेख, कांतीलाल पानसरे, सय्यद खालिद, पत्रकार समीर शेख यानी अभिनंदन केले. डॉ. रज्जाक सय्यद यांची मोठी मुलगी आयशा सय्यद हिचे इ-चड चे वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाले आहे तर दोन्हीही मुलींना वैद्यकीय क्षेत्रात सेवा करण्यासाठी संधी मिळाली. सर्व क्षेत्रामधून अलीशा सय्यद हिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



दिंद्रुड: माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड ते मोहखेड रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात पावसाचे पाणी साचून दुर्गंधी पसरली आहे.ये-जा करणार्या नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत असून संबंधित विभागाने खड्डा बुजविण्याची मागणी होत आहे.

# संत संगती मानवी जीवनाचे कल्याण करते

## रामायणाचार्य एकनाथ महाराज गाढे यांचे प्रतिपादन

शिरूर । प्रतिनिधी

संताची संगती केल्याने मानवी जीवाला आकार येतो. संताचा सहवास हा मानवी जीवनाचे कल्याण घडवून आणतो. माणसाला जर आपल्या जीवनाचे कल्याण करून घ्यायचे असेल तर माणसाने संत संगती केली पाहिजे. संत संगतीतच मानवी जीवनाचे कल्याण असल्याचे प्रतिपादन रामायणाचार्य एकनाथ महाराज गाडे यांनी शृंगऋषी गडावर केले आहे.



शिरूर कासार तालुक्यातील शृंगऋषी गडावरती शृंगारवाडी ग्रामस्थांच्या आयोजनातून गेल्या चार दिवसापासून अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या थाटामध्ये पार पडत आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून पंचक्रोशीतील भाविक भक्तांना अध्यात्मिक ज्ञान प्रबोधन करण्यासाठी हभप. रामायणाचार्य एकनाथ महाराज गाढे यांच्या संगीत राम कथेचे आयोजन करण्यात आले आहे. कथा श्रवण करण्यासाठी गेल्या चार दिवसापासून गडावरती भाविक-भक्तांची मोठी गर्दी दाटली आहे. उपस्थित भाविक भक्तांना उपदेश करताना हभप. गाडे महाराज म्हणाले पंचक्रोशीतील भाविक भक्तांवरती साधू संतांचे मोठे उपकार आहेत. साधू संतांनी अवतार घेऊन भाविक भक्तांच्या उद्धाराचे कार्य केले आहे. पंचक्रोशीतील साधुसंत श्री संत वामनभाऊ महाराज, श्री.संत भगवान बाबा, श्री.नगद नारायण महाराज श्री. संत बाळू मामा, स्वामी निगमानंद महाराज, तुळशीराम महाराज, तुकाराम महाराज आदी साधुसंतांनी अवतार घेऊन जन उद्धाराचे कार्य केले आहे. त्यांनी दाखवलेल्या मार्गावरती समाज मार्गक्रमन करत आहेत. म्हणूनच आज अध्यात्मिकआणि पान ३ वर

# तन्वी खिलारे हिची नाट्य छटासाठी निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील कैलास आजीनाथ खिलारे यांची मुलगी बालाजी इंग्लिश मेडीयम स्कूल शिरूर मधून तन्वी कैलास तन्वी खिलारे हिची खालील बळकट गुणविशेषे लक्षात घेऊन तिला ''सर्वोत्कृष्ट राज्य स्तरीय नाट्य छटा'' साठी निवडण्यात आले आहे.



तन्वीने केलेल्या भूमिकेतील भावना (राग, आनंद, वेदना, आश्चर्य इ.) प्रेक्षकांपर्यंत खूप खोलवर आणि प्रभावीपणे पोहोचवता आल्या. तिचा अभिनय केवळ संवाद वाचनापुरता मर्यादित नव्हता, तर तो तिच्या चेहऱ्यामोऱ्यावरील हावभाव, शारीरिक बोलीभाषा आणि डोळ्यातून व्यक्त होणाऱ्या भावनांमध्ये स्पष्ट जाणवला.

तिने मंचावर एक विशिष्ट आत्मविश्वास आणि उर्जा दाखवली. तिच्याकडे पाहण्यासारखे काहीतरी होते, ज्यामुळे प्रेक्षकांचे लक्ष सतत तिच्याकडेच केंद्रित राहिले. मंचावर हलणे, स्थान व्यापणे () आणि इतर कलाकारांशी संवाद साधताना तिची सहजता प्रशंसनीय होती.


तिचे उच्चार अत्यंत स्पष्ट आणि ऐकण्यास सोपे होते. प्रत्येक संवादाला तिने योग्य तोल, आवाजाची पान ३ वर

# हुतात्मा स्मारकाचे काम रखडले गुत्तेदारावर प्रशासन मेहरबान

## नागरिकांचा संताप, आंदोलनाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायत हद्दीतील हुतात्मा स्मारकाचे काम गेल्या कित्येक वर्षांपासून रखडले आहे. स्मारक परिसराचा विकास करण्यासाठी नगर पंचायतने सिमेंट काँक्रीट रस्ता, नाली, शौचालय, पेव्हिंग ब्लॉक व लँडस्केपिंगची कामे भामेश्वर इन्फ्रा प्रा. लि. या गुत्तेदारास दिली होती. परंतु निविदा व करारनाम्यात स्पष्ट अटी



असतानाही आजतागायत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.काम सुरू न झाल्याने स्मारक परिसरात पान ३ वर

# महावितरणकडून विज चोरी रोखण्याची धडक मोहीम :वायरची होळी केली

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे दिवसेंदिवस लोकसंख्यात झपाट्याने वाढ होत आसल्याने विज वापरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने तलवाडा व तलवाडा परिसरात ट्रान्सफार्मर जळण्याच्या प्रकारात कमालीची वाढ होत आसल्याचे निदर्शनास येत आसल्याने तलवाडा विभागाचे सहाय्यक अभियंता श्री प्रधान साहेब यांनी आपल्या सहकर्मीयांसोबत दिनांक २१/८/२०२५ रोजी सकाळी ११ वाजल्या पासुन तलवाडा गावात आकड़े टाकून विज चोरी होत आसलेल्या भागात आचानक आकड़े पकडण्यास



सुरुवात केल्याने आचानक महावितरणचा ताफा गावात घुसल्याने आकडे बहादरांची एकच धांधली ऊडल्याचे चित्र या वेळी पहावयास भेटले असुन आणेक आकडे धारकांचे हजारो मिटर वायर या वेळी जप्त करण्यात येऊन तलवाडा सबस्टेशन येथे आणुन ते जाळुन टाकण्यात आले. यावेळी विज वापर धारकांना सहाय्यक अभियंता प्रधान साहेब यांनी महावितरणला सहकार्य करण्याचे आव्हान केले. प्रतेक विज वापर धारकांनी रितसर कोटेशन भरुन विजचोरी थांबवावी विज ही आज प्रतेक कुटूंबियांसाठी म्हत्वाची असुन विज चोरुन आसे किती दिवस चालणार म्हणून गरजवंतानी महावितरण कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून वेळीच विज जोडणी करुन घ्यावी हे महावितरण व विज ग्राहकांसाठी ठरणार आसल्याचे यावेळी सहाय्यक अभियंता प्रधान यांनी सांगितले आहे. आजच्या धडक मोहीमेत सहाय्यक अभियंता, प्रधान, सहायक अभियंता गुंजाळ , सानप , फोरमन काळे , खरात साहेब, भुंगे साहेब, मोटे , पवार, बाबरे , मुनीर शेख, शिंदे , शेख जावेद , खरात , मोरे, आदिंनी या कार्यवाहीत सहभाग घेतला होता.

# ज्येष्ठ पत्रकार सर्वोत्तम गावरसकर यांचा नागरी सत्कार

## सत्काराला उपस्थित राहण्याचे मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे आवाहन

बीड/ प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर अण्णा यांना मराठी पत्रकार परिषदेचा नागोजीराव दुधगावकर स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जालना रोडवरील हॉटेल अन्वीता येथे पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यासह सर्व सन्माननीय संपादक उपस्थित राहणार आहेत.






या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे माजी विभागीय सचिव दिलीप खिस्ती, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय आरबुणे ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, सचिन पवार,अविनाश कदम, जुनेद बागवान, दिलीप झगडे, संजय रानभरे, गौतम बचुटे ,कादर मकरानी , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, मधुकर तौर, जालिंदर नन्नवरे ,अजय जोशी, हरीश यादव, विजय आरकडे, सतीश सोनवणे, प्रशांत लाटकर आदींनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# काळेवाडी पोलिसांची कामगिरी वाहन चोरीची टोळी चेरबंद आठ लाखाचा मुद्देमाल जप्त

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड व परिसरामध्ये चार चाकी व दुचाकी वाहन चोरीच्या घटना वाढत असल्याने वरिष्ठांनी दिलेले आदेशानंतर काळेवाडी पोलीस ठाणे च्या पथकाने तपास करून या वाहन चोरीचा छडा लावला आरोपीला ताब्यात घेत त्यांच्याकडून आठ लाख ४० हजार रुपयाचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

वाहन चोरी करणा-या गुन्हेगारांना अटक, आरोपींकडुन ८,४०,०००/-रु.कि.च्या २० दुचाकी हस्तगत, वाहन चोरीचे एकुण १० वाहन चोरीचे गुन्हे उघडकाळेवाडी पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी वाहनचोरी व घरफोडीचे गुन्हयांना प्रतिबंध करण्याबाबत सुचना दिल्याने त्या अनुषंगाने श्री. राजेंद्र बहिरट वरिष्ठ पोलीस निरीक्षक काळेवाडी पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सहा. पोलीस निरीक्षक श्री. वैभव गुरव, पोलीस उपनिरीक्षक श्री. नागनाथ सुर्यवंशी व तपास पथकातील अंमलदार यांना रेकॉर्डवरील वाहनचोरी करणा-या गुन्हेगारांवर लक्ष ठेवुन त्यांना चेक करन वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या.

त्या अनुषंगाने काळेवाडी पोलीस स्टेशन तपास पथकातील सहा. पोलीस निरीक्षक श्री. वैभव गुरव, पोलीस उपनिरीक्षक श्री. नागनाथः सुर्यवंशी, श्रेणी पौ उपनि.श्री राजेंद्र काळे, पोहवा/१३६६



स्वप्निल खेतले चोहवा/१११८ प्रमोच कदम, पोहवा/१२२३ अतिक शेख, पोशि/२१६७ अज्य अरुण फल्ले, पोशि/२९७५ रमेट रखेककार, पोशि/३१५९ गणेश जाधव असे काळेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करत असताना पोहवा/१११८ प्रमोद कदम यांना बातमी मिळाली कि, पायपीर चौक काळेवाडी येथे राहणारा एक इसम हा एक पल्सर मोटार सायकल वापरत असुन तो संशयीत वाटत आहे. येणे प्रमाणे बातमी मिळाल्याने बातमीदाराचे मार्फतीने त्याचा काळेवाडी परिसरामध्ये शोध घेत असताना तो पाचपीर चौकात राहत असल्याचे खात्रीशिर माहीती मिळाल्याने आम्ही पाचपीर चौकामध्ये सापळा लावुन थांबलो. काही येळामध्ये लाल रंगाचे पल्सर मोटार सायकल वरून एक व्यक्ती असल्याचे दिसले आम्ही त्यास शिताफीने पकडले त्याचेवाडे असलेल्या गाडीचा नंबर पाहिला असता तो यु.पी. ७०/डी.एन./८१६३ असा होता. नमुद व्यक्तीस त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव-शुभम चंद्रकांत शिंदे वय-२६ वर्षे रा. पाचपीर चौक, नवेनगर काळेवाडी पुणे मुळ रा. फौजी आंबवडे, ता.महाड, जि. रायगड असे असल्याचे सांगितले. त्तो वापरत असलेली पल्सर मोटार सायकल व मोटार सायकलबाबत त्याचेकडे विचारणा केली असता त्याने नमुद गाडी त्याने त्याचे मित्राकडुन विकत घेतल्याचे सांगितले, आम्ही नमुद व्यक्तीस गाडीसह पोलीस स्टेशन येथे आणले व त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याने नमुद पल्सर मोटार सायकल त्याचा मित्र गुन्हयातील अटक आरोपी नागे सोमनाथ शांताराम कासरुंग वय-३२ वर्षे, रा.नेन्हे. दत्तवाडी, मारुंजी रोड घाणेकरवस्ती, ता.मुळशी, जि.पुणे मुळ रा. करंजमाळ, ता.महाड, जि. रायगड याचेकडुन विकत घेतल्याचे सांगितले, आरोपी याचे बोलण्यामध्ये व त्याचेकडे तपासामध्ये तो खोटे बोलत असल्याबाबत संशय आल्याने मिळालेल्या पल्सर मोटार सायकलचे चेसी नंबर, इंजिन नंबर वरुन मोटार सायकल मालकाची माहिती प्राप्त केली व काळेवाडी पोलीस स्टेशन कडील मोटार सायकल चोरीचे दाखल गुन्हयाचे माहिती घेतली असता ननुदची गाठी ही काळेवाडी पोलीस स्टेशन गु.रजि. नं. २८२/२०२५ बी.एन.एस.३०३ (२) मधील चोरीस गेलेली असल्याचे निष्पण्ण झाले.



## शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय भूसंपादन नाही–डॉ. योगेश म्हसे


हिंजवडी । प्रतिनिधी

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील प्रस्तावित ६५ मीटर रुंद रिंगरोडसाठी टीपी स्कीमच्या माध्यमातून सुनियोजित शहर उभारले जाणार आहे. मात्र कुठल्याही शेतकऱ्यांचे भूसंपादन त्यांच्या शंका व अडचणींचे निरसन आणि संमतीशिवाय होणार नाही, अशी ग्वाही पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

धामणे, गोदुंबरे, दारुंबरे, साळुंब्रे व सांगवडे गावांतील शेतकऱ्यांसोबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सुनील शेळके, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, संचालक अविनाश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

या योजनेमुळे वाहतूक कोंडी कमी होईल, अपेक्षित सुविधा निर्माण होतील व शेतकऱ्यांनाही दीर्घकालीन फायदा मिळेल, असे डॉ. म्हसे म्हणाले. तर आमदार शेळके यांनी शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्या आणि त्यांना योग्य मोबदला मिळवून द्या अशी सूचना प्रशासनाला केली.

## आता वेल्हे नाही, 'राजगड' म्हणा ! महसूल मंत्र्यांचा ऐतिहासिक निर्णय



**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र सरकारच्या निर्णयामुळे पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याच्या नामांतरावर शिक्कामोर्तब झाले आहे. राज्य सरकारने वेल्हे तालुक्याचे नाव आता राजगड असे केले आहे. या नावाला केंद्र सरकारची मंजूरी मिळाली आहे. वेल्हे तालुक्याला राजगड नाव देण्यासाठी केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची पहिली राजधानी असलेला राजगड किल्ला या वेल्हे तालुक्यात येतो. याच किल्ल्याचे नाव आता या वेल्हे तालुक्याला देण्यात आले आहे.**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखरबावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. वेल्हे तालुक्याचे नामंतर करण्यात आले असून आता या तालुक्याला राजगड असे नाव देण्यात आलेले आहे. लवकरच राज्य सरकारचे राजपत्र जारी केले जाणार आहे. पुणे जिल्ह्याच्या वेल्हे तालुक्यात अनेक ऐतिहासिक किल्ले आहेत.

स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचे नाव तालुक्याला देण्याची मागणी गेले अनेक वर्षांपासून केली जात होती. याबाबतचा निर्णय राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत घेतला होता. दरम्यान गेले अनेक वर्षे सुरू असलेली मागणी आता मान्य झाली आहे. वेल्हे तालुक्याचे नाव राजगड करण्यासाठी ७० पैकी ५८ ग्रामपंचायतींनी सकारात्मक भूमिका मांडली होती.

## लोणावळ्यात भरदुपारी दारूच्या नशेत तरूणींचा रस्त्यावर धिंगाणा

लोणावळा । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील पर्यटननगरी लोणावळा जिथे सहसा पर्यटक निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी जात असतात. पण आज इथे घडलेल्या या घटनेचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे, अगदी फ्री-स्टाईल तरूणींची हाणामारी लोणावळाकरांना बघायला मिळाली. काही पर्यटक तरूणी दारूच्या नशेत रस्त्यावर उतरल्या आणि एकमेकींना मारहाण करत अक्षरशः कुस्ती सुरू केली. जुना पुणे मुंबई महामार्गावर ए-१ चिक्की दुकानासमोर घडलेल्या या तमाशामुळे पाहण्यासाठी प्रचंड गर्दी जमली. परिणामी महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली.

परिसरात गाड्यांचे हॉर्न आणि तरूणींचा आरडाओरडा सगळं मिळून दुपारचं वातावरण अक्षरशः गोंधळलेलं होतं. हाकेच्या अंतरावर असलेल्या लोणावळा वाहतूक पोलिस घटनास्थळी धावत गेले. मात्र नशेत असलेल्या या पर्यटक तरूणी थांबायच्या नावच घेत नव्हत्या, उलट त्यांचा धिंगाणा पोलीस चौकीपर्यंतच चालू राहिला. शेवटी महिला पोलिसांनी हस्तक्षेप करत सर्वांना ताब्यात घेतलं. सध्या या पर्यटक महिलांची चौकशी सुरू आहे, कशावरून इतक्या टोकाची हाणामारी करत होते, याचा तपास लोणावळा पोलीस करतीलच. मात्र या घटनेमुळे लोणावळ्यात पर्यटकांसोबतच स्थानिकांमध्येही मोठी चर्चा रंगली होती. परिसरात या तरूणींची भांडण आणि वाद, गोंधळ सुरू असताना लोकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी जमली, यावेळी त्या दोघी एकमेकींचे केस धरून ओढत होत्या, तर इतर काहीजण त्यांचा वाद सोडवण्याचा प्रयत्न करत होते, पण त्या एकतच नव्हत्या, हा व्हिडीओ सध्या चर्चेत आला आहे.



## राज्यस्तरीय आरोग्य कार्यक्रमात पिंपरी चिंचवड अव्वल

पिंपरी : महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या एप्रिल व मे २०२५ च्या आरोग्य कार्यक्रमांच्या रँकिंगमध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. एप्रिल महिन्यात ४५.१८ गुणांसह महापालिकेने पहिला क्रमांक तर मे महिन्यात सर्व बाबींवर अधिक प्रगती करत ४७.७० गुण मिळवून पुन्हा आपले प्रथम स्थान अबाधित ठेवले.

या रँकिंगमध्ये मातृत्व आरोग्य, बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब नियोजन, किशोरवयीन आरोग्य, पीसीपीएनडीटी, आरसीएच पोर्टल, आयडीएसपी, क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, रेबीज नियंत्रण कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, डेंग्यू व मलेरिया नियंत्रण, असंसर्गजन्य आजार नियंत्रण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मानांकन, ई-औषधी, मोफत निदान सेवा, आयुष्मान भारत-आरोग्य व आरोग्य कल्याण केंद्रे, एचआयव्हीएस, आशा कार्यक्रम तसेच प्रशासन व वित्तीय व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या निर्देशकांचा समावेश होता.

या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पिंपरी चिंचवड महापालिकेने राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या यशामुळे पुन्हा एकदा हे अधोरेखित झाले आहे की, सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळेच आरोग्यसेवेत उत्तम कामगिरी साधता येते.

## ७५ वर्षात गोडसेंचे हिंदू विचार कोणाच्या घरात पोहचू दिले नाहीत; कीर्तनकार भंडारेंचा नवा दावा

**पुणे । प्रतिनिधी**

नथुराम गोडसे म्हटलं की फक्त बंदूक आठवते. उलट गोडसेंचा अभ्यास करायला हवा, गोडसेंचे हिंदुत्व समाजासमोर यायला हवं. गेल्या ७५ वर्षात गोडसेंचे हे विचार कोणाच्या घरात पोहचू दिले गेले नाहीत. नथुराम गोडसे म्हणजे फक्त बंदूक नाही. असं भंडारे म्हणत आहेत. दाऊद विरोधात पर्याय म्हणून लॉरेन्स बिष्णोईचं उदाहरण द्यावं लागेल. मी तरुणांना बिष्णोई व्हा, असा सल्ला दिलेला नाही, असा ही खुलासा भंडारेने केला आहे. जर आमच्या अंगावर आले तर हिंदूंमध्येही लॉरेन्स बिष्णोई आहे, असा इशारा देण्याचा प्रयत्न भंडारेंनी केला. वारकरी संप्रदायाकडे शांततेचं प्रतीक म्हणून पाहिलं जातं, मुळात तसं नाही. तर वारकरी संप्रदायाचे दोन अंग आहेत. त्यातला दुसरा अंग म्हणजे एका गालात मारली तर दुसरा गाल पुढं करा. हे हिंदू धर्माचे तत्व नाही, असं ही भंडारे म्हणाले आहेत. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरत यांच्यावर मी हल्ला करणार असं म्हणालो नाही. तर त्यांना अंतर्मुख करण्यासाठी मला नथुराम गोडसे व्हावं लागेल, असं मी म्हटल्याचं कीर्तनकार संग्राम भंडारेंनी खुलासा केला आहे. संगमनेरमधील १६ ऑगस्टच्या किर्तनावेळी माझ्यावर हल्ला झाला.



कीर्तनकारांवर असे हल्ले व्हायला लागले तर ही धोक्याची घंटा आहे, असं असताना या घटनेचं बाळासाहेब थोरातांनी मात्र समर्थन केलं. त्यामुळं बाळासाहेब थोरातांना या हल्ल्याचं गांभीर्य लक्षात यावं म्हणून मी नथुराम गोडसेंचे नाव घेतल्याचं भंडारे यांनी म्हटलं आहे. मला तर असं वाटत आहे हल्लेखोरांना बाळासाहेब थोरात यांनीच पाठवलं होतं की काय, जेव्हा माझं कीर्तन झालं, थोरात त्यांच्या मूळ जोरवे गावात त्या कीर्तनाच्या व्हिडिओ व्हायरल केले जात आहेत. ते घुलेवाडीतले नाहीत. त्यामध्ये मी राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बद्दल बोललो आहे, अमोल खताळ यांच्याबद्दल बोललो आहे. हे सर्वजण तिथे उपस्थित होते, त्यामुळे मी त्यांच्याबद्दल बोललो. बाळासाहेब तिथे उपस्थित असते तर मी त्यांच्याबद्दल दोन शब्द सकारात्मक बोललो असतो. जोरवे येथे बोलताना जे हिंदुत्व मी तिथे मांडलं, त्याचा राग थोरात यांना आलेला असेल आणि मला आता असं वाटत आहे की ते हल्लेखोर देखील बाळासाहेब थोरात यांनी पाठवलेले होते, कारण थोरात हल्लेखोरांचं समर्थन करत आहेत. माझी इच्छा होती, माझ्यावर झालेल्या अन्यायाच्या विरोधात जो हिंदूंचा मोर्चा निघाला त्यामध्ये हिंदू म्हणून बाळासाहेब थोरात यांनी सहभागी व्हायला पाहिजे होतं. एकटे आमदार अमोल खताळ त्यामध्ये दिसले, बाळासाहेब थोरात यांनी तिथं दिसायला हवं होतं. पण थोरात यांनी विरोधकाची भूमिका घेतली आणि हल्लेखोरांचा समर्थन केलं, याचं मला दुःख झालं आहे. मी त्यांना अंतर्मुख करण्यासाठी गोडसे यांचे नाव घेतलं होतं. मी म्हणालो नाही मी बाळासाहेब थोरात तुमच्यावर हल्ला करतो, माझ्यावर तर हल्ला झाला आहे. माझ्यावर अन्याय झाला आहे आणि सहानुभूती बाळासाहेब थोरात घेत आहेत असेही भंडारे यांनी म्हटलं आहे.

## सिंहगडावरील तानाजी कड्यावरुन युवक दरीत कोसळला; हैदराबादवरुन मित्रांसमवेत आला होता पर्यटनास

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या पावसाळी पर्यटनासाठी मित्र कंपनी, कुटुंबीय आणि वेगवेगळे ग्रुप्स निसर्सरम्य ठिकाणी जात आहेत. पुणे जिल्हा हाही पर्यटनासाठी प्रसिद्ध असून सिंहगड किल्ला आणि परिसरात दरवर्षी देशाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक येतात. त्यातच, पुण्यातील सिंहगड किल्ल्याच्या तानाजी कड्यावरून खोल दरीत कोसळून एक पर्यटक बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सिंहगड किल्ल्याच्या तानाजी कडा येथे हवा पॉइंटजवळील खोल दरीत पाय घसरून पडल्याने पर्यटक बेपत्ता झाला असून घटनास्थळी प्रशासन व पोलीस कर्मचारी पोहोचले आहेत. गौतम गायकवाड (वय २४) असे बेपत्ता तरुणाचे नाव असून त्याच्यासाठी शोधमोहिम राबवली जात आहे. गौतम हा हैदराबादवरुन मित्रांसमवेत पर्यटनास आला होता.



हैदराबाद येथून गौतमसह ५ जणांचा ग्रुप पुणे येथे फिरण्यासाठी आला होता. काल बुधवारी दुपारी ४.३० वाजता ते सिंहगडावर आले असता, या वेळेस सायंकाळच्या सुमारास तानाजी कड्याजवळ येऊन ते पर्यटनाचा आनंद घेत होते. त्यावेळी, गौतमने लघवीला जाऊन येतो असे मित्रांना सांगितले. मात्र, बऱ्याच वेळानंतरही तो परत आला नाही. त्यामुळे मित्रांनी गौतमचा शोध घेतला असता तो कुठेही आढळून आला नाही. जवळच हवा पॉइंटशेजारी त्याची चप्पल सापडली, मात्र तो दिसला नाही. सिंहगड भागात मुसळधार पाऊस असून, वाऱ्याचा वेगही जास्त आहे. वाऱ्याचा व जमिनीचा अंदाज न आल्याने गौतम खोल दरीत कोसळला असावा असा अंदाज त्याच्या मित्रांकडून लावला गेल्याने गौतमचा शोध घेतला जात आहे.

घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन आणि ग्रामीण पोलीस कर्मचारी, व स्थानिक गिर्यारोहक कार्यकर्ते या तरुणाचा रात्री उशिरापर्यंत शोध घेत होते. जवळपास एक हजार फुटापर्यंत खोल दरीत उतरून आपत्ती व्यवस्थापन पथकाने शोध घेण्याचा प्रयत्न केला. खोल दरीत जाऊन मुसळधार पाऊस, वाऱ्यात बेपत्ता गौतमचा शोध घेतला. मात्र रात्रीच्या अंधारात तो आढळून न आल्याने रात्री ११ वाजता शोधकार्य थांबवले. त्यानंतर, गुरुवारी सकाळी ६ वाजता पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात आले.

## हिंजवडीतील आयटी कंपनीतील ८२ कोटी रुपयांच्या डेटाची चोरी; स्वत:ची नवीन कंपनी थाटली, १०० हून अधिक वेबसाईट विकल्या

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी नगरीतील फ्युचरीइम टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड या नामांकित कंपनीतील माजी कर्मचाऱ्यांनी गोपनीय सोर्स कोड आणि सॉफ्टवेअर सोल्युशन ची माहिती चोरून, तब्बल ८२ कोटी रुपयांचे कंपनीचे नुकसान केले आहे, ही घटना एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२५ या कालावधी मध्ये घडली होती, याप्रकरणी कंपनीचे व्यवस्थापकीय अधिकारी दत्तात्रय प्रभाकर काळे यांनी पिंपरी चिंचवड पोलिसांच्या सायबर पोलिसांत फिर्याद दिली होती. ही चोरी कंपनीमधीलच माझी तीन कर्मचाऱ्यांनी आणि एका महिलेने मिळून केली असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती.

याप्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिसांच्या सायबर पोलिसांनी माजी कर्मचारी विश्वजीत मिश्रा, नयूम शेख ,सागर विष्णू यांना अटक केली आहे. सायबर पोलिसांनी त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेले तीन लॅपटॉप चार मोबाईल हस्तगत केले आहेत, पोलिसांनी याप्रकरणी दिलेल्या माहितीनुसार या माजी कर्मचाऱ्यांनी चोरी केलेला डेटा सोल्युशनचा वापर करून स्वतःची नवीन कंपनी स्थापन केली होती. एवढेच नाही तर या कंपनीच्या



नावाखाली त्यांनी १०० हून अधिक बेकायदेशीर वेबसाईट तयार करून त्या ग्राहकांना विकल्या होत्या. या प्रक्रियेत त फिर्यादी यांच्या कंपनीला मिळणारा मोबदला आणि भविष्यातील करारातील अपॉर्च्युनिटी लॉस तसेच इतर तांत्रिक सेवांचा महसूलही मोठ्या प्रमाणावरती कमी झाला होता. या सर्व गोष्टींमध्ये कंपनीचे ८२ कोटी रुपयांचे नुकसान झाले होते.

अटकेत असलेल्या आरोपींनी केवळ भारतातच नाही तर अमेरिकेमध्ये सुद्धा असलेल्या ग्राहकांसोबत संगणमत करून गुन्हे केल्याचे कबूल केले आहे. या संपूर्ण प्रकरणानंतर आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांनी डेटाची सुरक्षा आणि करारातील अटी , कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्याबाबत अधिक कठोर भूमिका घेणे गरजेचे असल्याचे आणि काही मोजक्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांना कंपनीने पाठीशी न घालण्याचे आवाहन पोलिसांनी केला आहे.पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांनी तब्बल ८२ कोटींचा तोटा घडवून आणणाऱ्या तिघा आरोपींना अटक केली आहे. संबंधित आरोपींनी एका खासगी कंपनीमधील सॉफ्टवेअर सोल्यूशन्स आणि सोर्स कोड्स चोरून स्वतःची नवी कंपनी सुरू केली आणि त्याद्वारे शंभरहून अधिक संकेतस्थळे तयार करून उत्पन्न मिळवले.सायबर पोलिसांचे सहाय्यक निरीक्षक प्रवीण स्वामी यांनी सांगितले की, या तिघा आरोपींबरोबर आणखी दोन साथीदारही या प्रकरणात सामील आहेत. त्यांनी चोरी केलेल्या कोड्स व सॉफ्टवेअरचा गैरवापर करून प्रतिस्पर्धी कंपनी उभी केली. यामुळे तक्रारदार कंपनीला मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसला. बाणेर येथील त्यांच्या नव्या कंपनीचा आम्ही शोध घेतला. पोलिस उपनिरीक्षक सागर पोमन यांनी पथकासह गेल्या आठवड्यात छापा टाकून आरोपींना ताब्यात घेतले, असे स्वामी यांनी सांगितले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी तीन लॅपटॉप आणि चार मोबाईल फोन जप्त केले असून, फरार असलेल्या इतर दोन आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## पवना, मुळा, इंद्रायणी नद्यांच्या पाणीपातळीत वाढ

पिंपरी । प्रतिनिधी

गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे आणि पवना तसेच मुळशी धरणातून होणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे नदीकाठच्या संजय गांधीनगर, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, जाधवघाट, किवळे आणि वाल्हेकरवाडी परिसरातील सुमारे दोन हजार नागरिकांना रात्री उशिरा महापालिकेच्या शाळांमध्ये स्थलांतरित करण्यात आले.

सोमवारपासून पडणाऱ्या संततधार पावसामुळे पवना धरण शंभर टक्के भरले असून, पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. पवना आणि मुळशी धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग केला जात आहे. मंगळवारी रात्री पवना धरणातून १५,७७० क्युसेक आणि मुळशी धरणातून सकाळी आठ वाजल्यापासून ३१,५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. यामुळे नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली असून, नदीकाठच्या घरांमध्ये पाणी शिरण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने नागरिकांचे स्थलांतर केले.